www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 250 वा रविवार दि. 25 मे २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## ‘दोषींना पाठिशी घालणाऱ्यांवरही कारवाई करणार’, एकनाथ शिंदेंनी घेतली वैष्णवी हगवणेच्या आईवडिलांची घेतली भेट

वैष्णवी हगवणे यांच्याबाबत घडलेली ही घटना अमानवीय आहे. पुरोगामी महाराष्ट्रात अशा घटना घडणे दुर्दैवी आहे. माणुसकीला काळीमा फासणारी घटना आहे. याप्रकरणातील दोषींना कोणीही पाठिशी घालू नये. तसे केल्यास कोणीही राजकीय पदाधिकारी किंवा कोणताही मोठा अधिकारी असले तरी त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असा इशारा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला.

वैष्णवी हगवणे यांच्या आईवडिलांची वाकड येथे शनिवारी रात्री भेट घेऊन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांत्वन केले. त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, ‘आजच्या काळात सुनेला मारहाण होणं, पैशांची मागणी करणं अत्यंत चुकीचे आहे. आताच्या काळामध्ये अशी मानसिकता चांगली नाही. सून आपल्या मुलीसारखीच आहे. लाडकी बहीण, लाडकी मुलगी अशापद्धतीने लाडकी सून देखील मानली पाहिजे. तशी मानसिकता केली पाहिजे.’ ‘याप्रकरणी गुन्हा दाखल करून पोलिस सखोल तपास करीत आहेत. मुख्यमंत्र्यांनीही पोलिसांना आदेश दिले आहेत. अशा घटनांमध्ये कोणीही राजकारण आणता कामा नये. अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये, अशी अपेक्षा आहे. तपासात त्रुटी राहणार नाहीत’, असेही ते म्हणाले.

**‘फास्ट ट्रॅक’साठी प्रयत्न : पंकजा मुंडे**

“वैष्णवीच्या बाबतीत जे घडले ते दुर्दैवी आहे. ज्यांनी तिचा जगण्याचा हक्क हिरावून घेतला आहे त्यांना कडक शिक्षा होईल. ही केस ‘फास्ट ट्रॅक’ न्यायालयात चालायला पाहिजे. यासाठी प्रयत्न सुरू आहेत,” अशी माहिती राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. वाकड येथे शनिवारी मंत्री मुंडे यांनी कस्पटे कुटुंबियांना भेटून त्यांचे सांत्वन केले.

**रामदास आठवले, करुणा मुंडे यांनीही केले सांत्वन**

वैष्णवी हगवणे यांच्या आईवडिलांचे सांत्वन करण्यासाठी शनिवारी रामदास आठवले, करुणा शर्मा-मुंडे आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या सरचिटणीस रिटा गुप्ता यांनीही वाकड येथे भेट दिली. कस्पटे कुटुंबियांकडून घटना जाणून घेत संवेदना व्यक्त केल्या



## जन्म- मृत्यू प्रमाणपत्र चौकशी अनुषंगाने केंद्राचे पथक लवकरच सिल्लोड येथे येणार

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** सिल्लोड तालुक्यात देण्यात आलेल्या जन्म मृत्यू प्रमाणपत्र बाबत चौकशी च्या अनुषंगाने केंद्राचे पथक लवकरच सिल्लोडला येणार असून या प्रकरणात आता काय घडामोडी घडतात याकडे शहरवासी यांचे लक्ष लागून आहे. भारतीय जनता पार्टीचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी सिल्लोड उपविभागीय अधिकारी कार्यालयाच्या वतीने देण्यात आलेल्या जन्म प्रमाणपत्र बाबत आक्षेप घेऊन सदरील प्रमाणपत्र हे खोट्या कागदपत्रांच्या आधारावर देण्यात आल्याचा आरोप केला होता. याशिवाय तालुक्यात मोठ्या प्रमाणात सदरील प्रमाणपत्र हे बांगलादेशी नागरिकांना दिल्या बाबतचा गंभीर आरोपही सोमय्या यांनी केला होता. याशिवाय बोगस कागदपत्रांच्या आधारावर प्रमाणपत्र देणाऱ्या उपविभागीय अधिकारी लतीफ पठाण यांचेवर गुन्हा दाखल करण्यास बाबतही त्यांनी पोलीस प्रशासनास निवेदन दिले होते. किरीट सोमय्या यांचे आरोपानंतर उपविभागीय अधिकारी कार्यालयातील जन्म प्रमाणपत्र वाटप करण्यात आलेल्या नागरिकांच्या मूळ संचिकांची बारकाईने तपासणी सुरू आहे याबाबत संबंधित कार्यालयाकडून वेळोवेळी पोलीस प्रशासनास माहिती देणे सुरू आहे. किरीट सोमय्या यांच्या तक्रारीच्या अनुषंगाने चौकशी कामी सिल्लोडला लवकरच केंद्र सरकारचे प्रतिनिधी येणार असून या चौकशीत काय निष्पन्न होणार याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

## अलिबाग मार्गावर पर्यटकांची वऱ्हाडांची गर्दी; वाहतूक कोंडीत जनतेचा थयथयाट, प्रशासन कोठे आहे?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



**अलिबाग-** वडखळ मार्गावर शनिवारी (दि. २४) सकाळपासून सुरू झालेली वाहतूक कोंडी दिवसभरात भयानक स्वरूपाला पोहोचली आहे. सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-पुण्यातून आलेल्या पर्यटकांनी अलिबाग, रेवदंडा ,मुरुडकडे मोठ्या प्रमाणावर धाव घेतल्याने संपूर्ण मार्ग ठप्प झाला आहे. याचदरम्यान, लग्नसराईमुळे वऱ्हाडी मंडळींचीही एकच झुंबड उडाल्याने रस्त्यावर अक्षरशः गर्दीचा स्फोट झाला आहे. रस्ते अरुंद असतानाही काही बेफिकीर वाहनचालकांनी डबल लाईन करून वाहतुकीची परिस्थिती आणखी बिकट केली. परिणामी, दोन्ही बाजूंनी वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली असून प्रवाशांची गैरसोय टोकाला पोहोचली आहे. पंधरा-वीस मिनिटांचा प्रवास करताना दोन ते तीन तास लागण्याची वेळ आली आहे. आजारी रुग्णांसाठी धावणाऱ्या रुग्णवाहिका रस्त्यात अडकल्या आहेत, आणि त्यांना मार्ग मिळवण्यासाठी अक्षरशः झगडावे लागत आहे.या सगळ्या गोंधळात प्रशासन कुठे आहे, असा प्रश्न सामान्य नागरिक विचारत आहेत. पेझारी नाका वगळता संपूर्ण मार्गावर पोयनाडपासून धरमतरपर्यंत वाहतूक सुरळीत करण्यासाठी फक्त एकच वाहतूक पोलीस कर्मचारी नेमण्यात आला आहे. ही केवळ दुर्लक्षाची परिसीमा आहे की कारभाराचा फज्जा उडालाय, असा सवाल जनतेतून उपस्थित होत आहे. Aवाहतूक व्यवस्थेचे पूर्णपणे तीनतेरा वाजले असून, सुट्ट्यांचे नियोजन प्रशासनाच्या गाऱ्हाणीला जणू धक्का देत आहे. नागरिकांनी संयम पाळत सहकार्य केले तरी वाहतूक विभागानेही आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवली पाहिजे, अशी जोरदार मागणी आता स्थानिक पातळीवरून होऊ लागली आहे.

## रस्त्यावर गाडी उभी केली, तर भरावा लागणार शुल्क : छत्रपती संभाजीनगर महापालिकेचे पे अँड पार्क धोरण

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी | छत्रपती संभाजीनगर**
**बातमीदार : आसाराम विरकर**

छत्रपती संभाजीनगर शहरात पार्किंगचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. रस्त्यांवर व फुटपाथवर नागरिकांनी वाहने लावल्यामुळे वाहतूक व्यवस्था कोलमडली आहे. या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेने आता पे अँड पार्क धोरण राबवण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, शहरातील प्रमुख व्यापारी भाग, पर्यटन स्थळे, रुग्णालय परिसर आणि रहदारीची गर्दी असलेल्या ठिकाणी रस्त्यावर वाहन उभी केल्यास शुल्क भरावे लागणार आहे. त्यासाठी महापालिकेने लवकरच खास एजन्सीची नेमणूक करण्यासाठी निविदा काढण्याचे ठरवले आहे. महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, बेधडकपणे रस्त्यावर वाहने उभी केल्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. त्यामुळे पे अँड पार्क धोरणामुळे शिस्तबद्ध वाहतूक व्यवस्था निर्माण होईल आणि नागरीकांमध्ये जबाबदारीची जाणीव निर्माण होईल. विशेष म्हणजे, संबंधित एजन्सीला तीन वर्षांची निविदा दिली जाणार असून, दर महिन्याला शहरातील विविध भागांमध्ये पार्किंगसाठी शुल्क आकारले जाणार आहे. यासाठी खास सॉफ्टवेअर व क्यूआर कोड प्रणालीचा वापर होणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. फुटपाथवरील अतिक्रमण हटवून पादचाऱ्यांसाठी मोकळा रस्ता उपलब्ध करून देण्यासाठी हे धोरण प्रभावी ठरणार आहे.

## अनिल जाधव यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन निमित्त अभिष्टचिंतन सोहळा आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

म्युन्सिपल एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस आणि ज्येष्ठ कामगार नेते मा. अनिल जाधव यांच्या सहस्त्रचंद्रदर्शन अर्थात साठाव्या जन्मदिनी त्यांच्या सामाजिक आणि संघटनात्मक कार्याचा गौरव करण्याच्या उद्देशाने पनवेल येथील काळण समाज हॉल येथे अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. या विशेष प्रसंगी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस मा. नितीन पाटील, जिल्हा सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, ओबीसी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, म्युन्सिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष ॲड. सुरेश ठाकूर, कार्याध्यक्ष संतोष पवार आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना मा. नितीन पाटील यांनी अनिल जाधव यांचा संघर्षमय जीवनप्रवास अत्यंत प्रभावीपणे उलगडून दाखवला. “अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून



उभे राहत त्यांनी कामगार हक्कांसाठी दिलेला लढा अनुकरणीय आहे. त्यांच्या कार्यामुळे कामगार क्षेत्रात एक नवा मापदंड प्रस्थापित झाला असून, त्यांचे जीवन कार्य हे भावी पिढ्यांसाठी प्रेरणादायी आहे,” अशा शब्दांत त्यांनी गौरवोद्गार काढले.कार्यक्रमाच्या निमित्ताने अनिल जाधव यांच्या दीर्घकालीन सेवाभावी योगदानाची विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रशंसा केली असून, त्यांच्या नेतृत्वाखाली कामगार चळवळीला लाभलेल्या दिशादर्शक मार्गदर्शनाबद्दल विशेष कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

## महाराष्ट्रात प्रथम येऊन न्यायाधीश झालेल्या ऋचा कुलकर्णी आणि स्टेट बँक ऑफ इंडिया मॅनेजर म्हणून निवड झालेल्या मृणाली कुलकर्णी यांचा गौरव सोहळा...

### आज आमदार सुरेश आण्णा धस यांच्या हस्ते होणार गौरव...

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) -** मेहनत, चिकाटी आणि दृढनिश्चयाच्या जोरावर यशाचे शिखर गाठणाऱ्या कु.ऋचा विठ्ठल कुलकर्णी आणि कु.मृणाली मिलिंद कुलकर्णी या दोन गुणवंत यशस्विनींचा गौरव सोहळा आज रविवार, दिनांक २५ मे रोजी सकाळी ११:०० वाजता श्री रेणुका माता मंदिर, पाटोदा येथे मोठ्या उत्साहात संपन्न होणार आहे. या कार्यक्रमात आमदार सुरेश आण्णा धस(आमदार, आष्टी/पाटोदा/शिरूर) यांच्या हस्ते या यशस्विनींचा गौरव होणार आहे. कु.ऋचा कुलकर्णी यांनी MPSC मार्फत JMFC परीक्षेत राज्यात प्रथम क्रमांक पटकावून न्यायाधीश पदासाठी निवड मिळवली आहे. तर कु.मृणाली कुलकर्णी यांनी स्टेट बँक ऑफ इंडिया मध्ये स्पर्धात्मक परीक्षेत उत्तीर्ण होत



असिस्टंट मॅनेजर पदावर निवड मिळवली आहे. या दोघींचे यश संपूर्ण पाटोदा परिसरासाठी अभिमानास्पद ठरले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन सर्व ब्राह्मण समाज, पाटोदा यांच्या वतीने करण्यात आले असून, सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कार्यक्रमानंतर इंजी.किरणकुमार देशमुख पाटोदा यांच्या सौजन्याने सर्व उपस्थितांसाठी कार्यक्रम स्थळी भोजन व्यवस्था करण्यात आली आहे. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन सर्व ब्राह्मण समाज पाटोदा यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

## उन्हाळयात पावसाळा सुरु झाल्याने बळीराजा चिंतेत...

### अवकाळीने उडविली झोप, शेती मशागतीची कामे कशी करावी, शेतकऱ्यांना पडला प्रश्न

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**

**शिरुरआनंतपाळ :** मे महिणा शेतकऱ्यासाठी मशागतीचा म्हणुन ओळखला जातो. मात्र यावर्षी मे महिण्याच्या पंधरा तारखेपासुन अवकाळी पावसाने शेतकऱ्याची झोप उडाली आहे. ऊन्हाळ्यात पावसाळा की पावसाळ्यात ऊन्हाळा हे समजत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत. खरीप हंगामपुर्व शेतीची मशागत कशी करावी हा शेतकऱ्यांना प्रश्न पडला आहे.

एप्रिल व मे च्या पंधरा तारखेपर्यंत पैपाहुणे घरातील लग्न समारंभ उरकण्याचा शेतकऱ्याचा कल असतो. १५ मे नंतर जरा ऊन्ह कमी होत असल्याने शेतकरी खरिप हंगामपुर्व मशागतीच्या कामात



व्यस्त होतो. परंतु या वर्षी मे महिण्याच्या प्रारंभापासुनच अवकाळी पावसाने दररोजच बस्तान बसविले आहे. त्यामुळे शेतातील नागंरटी, पाळी, शेतातील काडीकचरा दसकट वेचणे ते जाळणे आदी कामे करण्यात या अवकाळी पावसामुळे व्यत्यय येत असुन शेतामध्ये पाणी थांबले आहे. त्यामूळे शेतीची मशागत कशी करावी हा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

**गेल्या दहा दिवसापासुन पावसाची दररोज हजेरी...**

येरोळ गावासह परिसरातील गावात दररोज सकाळी कडक ऊन्ह पडत असुन सायंकाळी चार वाजल्यापासुन मेघगर्जेनेसह वादळी वारा मोठा अवकाळी पाऊस पडत आहे. नदीनाला व ओढ्याला पाणी वहात आहे. पावसाळ्यात मान्सुन बरसणार का असा शेतकरी विचार करत असुन खत बीबियाणे खरेदी करण्यासाठी शेतकरी पैशाची जुळवाजुळव करत आहेत.

यावर्षी मे महिण्याच्या प्रारंभापासुनच वादळी वारे व मेघगर्जेनेसह पाऊस पडत आहे. यावर्षी अनेक शेतकऱ्यांची शेतीची नांगरणी झालेली नाही. मृग नक्षण दहा बारा दिवसावर आले आहे. त्यामूळे खरिप हंगामपुर्व शेतीची मशागत कशी करावी याची चिंता लागली आहे.

**नागनाथ पाटील युवा शेतकरी येरोळ.**

आकाशात विजाचा कडकडाट सुरु झाले की शेतातील कामे थांबवुन सुरक्षीत स्थळी थांबावे लागत आहे. दररोजच पाऊस पडत असल्यामुळे शेतीची मशागत करता येत नाही. तापलेली जमीन खरिप हंगामातील पिक घेण्यासाठी उपयुक्त असते पण दररोजच पाऊस पडत असल्याने जमीनीत ओलावा असल्याने यावर्षी पिक जोमदार येईल की नाही असा प्नश्न येरोळ येथील अल्पभुधारक शेतकरी म्हैबुब मुजेवार यांनी व्यक्त केले.

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्ष पदार्पण निमित्त 'कीर्तन महोत्सव'

### कीर्तन महोत्सवाची नियोजन आढावा बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य आणि दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा ०२ जून रोजी ७४ वा वाढदिवस असून ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करणार आहेत. त्या अनुषंगाने दिनांक ३१ मे ते ०२ जून पर्यंत पनवेलमध्ये तीन दिवस 'कीर्तन महोत्सव' आयोजित करण्यात आला आहे. मंदिरे बांधणे, मंदिराचे जिर्णोद्धार तसेच दिंडीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सढळ हस्ते केली आहे, त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा अध्यात्मिक मोठ्या प्रमाणात उत्सव म्हणून साजरा झाला पाहिजे, यासाठी वारकरी संप्रदायातील व्यक्तींनी पुढाकार घेतला आहे. त्या संदर्भातील नियोजन बैठक आज (दि. २४) खांदा कॉलनी येथे आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि वारकरी संप्रदायातील ज्येष्ठांच्या उपस्थितीत पार पडली. या बैठकीस भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य संजय पाटील, राजेंद्र पाटील, नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, कोकण दिंडीचे अध्यक्ष पद्माकर महाराज पाटील,



शैक्षणिक, सामाजिक, राजकीय क्षेत्रात लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे कार्य अतुलनीय असे आहे. ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करत असताना वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमाची रेलचेल असावी अशी संकल्पना आमदार महेश बालदी यांनी मांडली. त्याची सुरुवात या कीर्तन महोत्सवाने अर्थात विठूरायाच्या नामस्मरणाने होणार आहे. वर्षभर विविध कार्यक्रमे होणारच आहेत त्याबरोबरीने भजन महोत्सवही आयोजित करणार आहोत. विशेष म्हणजे हा कार्यक्रम वारकरी संप्रदायाने आपला स्वतःचा कार्यक्रम समजून हाती घेतला आहे. तुमच्या सर्वांच्या सहभागातून हा महोत्सव मोठा होणार असून या महोत्सवात सहभाग घेत आहात त्याबद्दल ठाकूर कुटुंबाकडून मनस्वी आभार मानतो. - आमदार प्रशांत ठाकूर

बाळा महाराज भोपी, भोईर महाराज, धाऊ महाराज पाटील, ह. भ. प.. सुरेश पाटील, शंकर महाराज सांगडे, म्हात्रे महाराज, काशिनाथ महाराज पारठे, निवृत्तीबुवा चौधरी, जनार्दन पाटील, ज्ञानेश्वर महाराज शिंदे, वसंतशेठ पाटील, पुंडलिक महाराज फडके, मधुकर भगत, वसंत ढवळे, चंद्रकला जायभाये, सुजाता साबळे, गीताताई पाटील, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, शिवकर सरपंच आनंद ढवळे, अनेश ढवळे आदी उपस्थित होते. यावेळी आमदार महेश बालदी यांनी सांगितले कि, लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सारखा दानशूर आणि कर्तृत्ववान व्यक्तिमत्व जिल्हयात दुसरे झाले नाही. त्यामुळे त्यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस वर्ष संपूर्ण वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमाने साजरा करण्याचा आम्ही निर्णय घेतला आहे. अमृत महोत्सवी वर्षाच्या पदार्पण निमित्त अध्यात्मिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, कला अशा क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्यात येणार असून कीर्तन महोत्सव हा पहिला अध्यात्मिक कार्यक्रम असणार आहे. यामध्ये संगीत भजन, हरिपाठ, हरी कीर्तन आणि अध्यात्मिक क्षेत्रातील ज्येष्ठांचा सन्मान करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. मान्सूनपूर्व पाऊस आणि हवामान विभागाच्या सूचना लक्षात हा महोत्सव खांदा कॉलनी मधील सीकेटी महाविद्यालयाच्या भव्य मैदानावर निश्चित करण्यात आला असून हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी १३ मुख्य समित्या स्थापन करण्यात आल्याची माहिती आमदार महेश बालदी यांनी यावेळी दिली. तर अनंता महाराज पाटील यांनी या कीर्तन महोत्सवासाची रूपरेषा आपल्या प्रास्ताविकातून दिली.

## माजी आ.भीमराव धोंडे यांच्या अथक परिश्रमाला आले यश आष्टीत इंजीनिअरिंग पदवी कॉलेजला मान्यता

**दैनिक युवक आधार**
**मारुती सत्रे**
**बीड आष्टी प्रतिनिधी**

गेल्या ४० वर्षापासून सातत्याने आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये गोरगरीब सर्वसामान्य शेतकरी आणि कामगारांची मुले शिकावीत हा शाहू महाराज,कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श घेत गावोगावी शाळा,कॉलेज स्थापन करून माजी आ. भीमराव धोंडे यांनी सर्वांगीण विकासाचे द्वार खुले केले आहे. दरम्यान नुकतीच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थेस इंजिनिअरिंग पदवी कॉलेजची मान्यता मिळाल्याने आष्टी तालुक्यात आनंदोत्सव साजरा केला जात आहे.गेल्या अनेक वर्षापासून माजी आ.भीमराव धोंडे यांनी तालुक्यामध्ये शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमातून ५० हून अधिक शाळा,कनिष्ठ महाविद्यालये,वरिष्ठ



महाविद्यालये,पॉलिटेक्निक कॉलेज,अन्न व कृषी तंत्र महाविद्यालय,बी.एच.एम.एस, बी.ए.एम.एस.,बी.पी.एड, बी.एड.,डेअरी कालेज,कृषी तंत्र विद्यालय,कृषी महाविद्यालय आदी सह विविध शिक्षण संस्थांच्या रूपाने सर्वसामान्यां साठी स्वावलंबी जीवनाचा मार्ग दाखवला आहे.या त्यांच्या शिक्षण संस्थांमधून हजारो मुले शिक्षण घेऊन महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात स्वावलंबी जीवन जगत आहेत.त्यांच्यासह त्यांची पिढी माजी आ.भीमराव धोंडे यांना धन्यवाद देत आहेत. नुकतेच शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ इंजिनिअरिंग कॉलेज या पदवी अभ्यासक्रमासाठी मान्यता मिळाल्याने माजी आ.भीमराव धोंडे यांची स्वप्नपूर्ती झाली आहे.मात्र भविष्यात कॅन्सर रुग्णालय ( ५०० खाटांचे १०० कोटी रु.खर्चुन) उभारण्याचा मनोदय असल्याचे माजी आ.भीमराव धोंडे यांनी दैनिक झुंजारनेताशी बोलताना सांगितले. दरम्यान, शिक्षणमहर्षी माजी आ. भीमराव धोंडे यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये क्रांती केली आहे. सर्वसामान्यांची मुले योग्य मार्गाला जाऊन सर्व शिक्षण आष्टीसारख्या ग्रामीण तालुक्यात उपलब्ध करून नवा इतिहास रचण्यात आला आहे. नुकताच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद दिल्ली व महाराष्ट्र शासनाच्यावतीने भीमराव धोंडे यांच्या अथक परिश्रमाला प्रतिसाद देत शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ महेश इन्स्टिटयूट ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी आष्टी या पदवी अभियांत्रिकी अभ्यासक्रमाला मान्यता दिल्याने सबंध तालुक्यातील शिक्षण प्रेमींनी माजी आ. भीमराव धोंडे यांना अभिनंदन करून धन्यवाद दिले आहेत.

# स्वर्गीय कोठुजी कुंभारे वसतीगृहाचे इचलकरंजीत उद्घाटन

**दैनिक युवक आधार**
**इचलकरंजी प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**

मुंबईतील दानशूर समाज बांधव कै . कोठूजी कुंभारे यांच्या स्मृती चिरंतर ठेवण्याच्या उद्देशाने बांधलेल्या कै. कोठूजी कुंभारे वसतीगृहाचे उद्घाटन हम्पी येथील गायत्री पिठाचे अधिपती श्री श्री श्री दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या शुभहस्ते, व महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रकाशराव सातपुते व मॅनिंजिंग ट्रस्टी अंकुशराव उकार्डे यांचे प्रमुख उपस्थित दिमाखदारपणे संपन्न झाले महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाने केलेल्या आर्थिक मदतीने व श्री देवांग समाज रजिस्टर इचलकरंजी यांनी या वसतिगृहाचे बांधकाम केले आहे . याप्रसंगी मार्गदर्शन करताना स्वामीजींनी कोष्टी समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाचा प्रसार, आर्थिक प्रगती व समाजाची एकता होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. प्रारंभी देवांग समाज अध्यक्ष श्री विश्वनाथ मुसळे व त्यांच्या पत्नी सौ विद्याताई यांच्या हस्ते त्यांची पाद्यपूजा करण्यात आली. स्वामीजींचा सत्कार महाराष्ट्र कोष्टी समाजसेवा मंडळ मुंबईचे अध्यक्ष श्री प्रकाशराव सातपुते व अंकुशराव उकार्डे यांचे हस्ते व कोष्टी फेडरेशनचे अध्यक्ष श्री अरुणराव वरोडे यांच्या उपस्थित संपन्न झाला. स्वागत व प्रास्ताविक देवांग समाजाचे अध्यक्ष श्री विश्वनाथ मुसळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पंडित ढवळे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन श्री राजेंद्र सांगले यांनी केले. याप्रसंगी देवांग समाजाच्या चौंडेश्वरी गृहनिर्माण, महिला मंडळ, महिला पतसंस्था, युवा संघटना इत्यादी विविध संस्थांच्या वतीने स्वामीजींचा सत्कार करण्यात आला. या उद्घाटन प्रसंगी , निमंत्रित ट्रस्टी, श्री राजेंद्र ढवळे, उपाध्यक्ष उदयराव बुगड, सल्लागार विश्वनाथ मुसळे, श्री विठ्ठलराव डाके, महासचिव रामचंद्र निमणकर, सचिव मिलिंद कांबळे उदयराव बुगड , महिला कार्याध्यक्ष सौ स्मिता सातपुते, तसेच सौ स्मिता बगड,सौ संगीता धूत्रे ,श्रीमती प्रीती बुगड,सौ दीपा सातपुते, श्रीमती सुशीला फाटक ,सौ उज्वला कबाडे ,सौ.रूपा बुगड तसेच दिलीप भंडारे ,शितल सातपुते विलास पाडळे, डी,एम कस्तुरे ,राजेंद्र चांगले, प्रमोद मुसळे, कुमार कबाडे मधुकर वरुटे ,आनंदा साखरे, उत्तम म्हेत्रे, जयेश बुगड राहूल सातपुते दयानंद लिपारे महेश ढवळे इत्यादी मान्यवर तसेच समाज बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# खारघर सेक्टर १४ मधील कब्रस्तानाच्या जागेवरील अनधिकृत वापरावर तातडीची कारवाई करावी – आमदार प्रशांत ठाकूर यांची पोलीस आयुक्तांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)** खारघर मधील सेक्टर १४ येथील कब्रस्तानासाठी सिडकोने दिलेल्या जागेचा वापर अवैधपणे मशिद व अन्य धार्मिक कार्यक्रमाकरिता करण्याबरोबरच त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात झालेल्या अनधिकृत बांधकामांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवी मुंबईचे पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांच्याकडे केली. सिडकोने कब्रस्तानासाठी दिलेल्या जागेचा हेतुपुरस्सर अनधिकृतरीत्या मशिद व धार्मिक कार्यक्रमांसाठी वापर केला जात असल्याच्या गंभीर तक्रारींच्या पार्श्वभूमीवर आमदार प्रशांत ठाकूर यांनी शिष्टमंडळासह भेट घेत या गंभीर विषयावर पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांचे लक्ष वेधले. या शिष्टमंडळात त्यांच्यासोबत भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, चिटणीस ब्रिजेश पटेल, खारघर शहर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, युवा मोर्चा खारघर अध्यक्ष नितेश पाटील, विश्व हिंदू परिषदेच्या प्रसन्ना धर्माधिकारी, क्रिश्ना बांदेकर, हिंदू जागरण मंचचे शिवम सिंग, ॲड. गायत्री खडवडकर, आदित्य



कांबळे, शैलेंद्र त्रिपाठी आदींचा समावेश होता. या संदर्भात आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोलीस आयुक्तांना निवेदनही दिले. या निवेदनातून विषयाचे गांभीर्य त्यांनी अधोरेखित केले. खारघर सेक्टर १४ येथील जागा सिडकोने कब्रस्तास्तानाकरिता राखीव ठेवली असतानासुद्धा सदर जागेचा वापर हा हेतुपुरस्सररित्या मशीद महणून केला जात असून सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणावर नमाज पठण व इतर धार्मिक कार्यक्रमाचे नियमितपणे आयोजन होत असल्याचे निदर्शनात आले असून हे अत्यंत चुकीचे व संतापजनक आहे. या प्रकारांमुळे सदर परिसरातील सामाजिक सलोखा धोक्यात आला असून आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे या परिसरात मुस्लीम समाजाची लोकवस्ती नसतानादेखील मुद्दामून हेतुपूर्वक या सर्व गोष्टी केल्या जात आहेत. जाणीवपूर्वक मुस्लीम समाजातर्फे या कब्रस्तानच्या जागेचे कब्रस्तान मशीद असे संबोधन केले जाते व याठिकाणी नमाज पठणाकरीता तसेच धार्मिक कार्यक्रमाकरीता त्या समाजातील लोकांना बोलावले जात असल्याचे लक्षात आले आहे. तसेच या भूखंडावर कुठल्याही प्रकारची परवानगी न घेता मोठयाप्रमाणात नमाजाकरीता सभागृह तसेच स्वच्छतागृह बांधण्यात आलेली असून त्याकरीता प्रचंड खर्च करून ग्रॅनाईट व मार्बलचा वापर केला आहे. एवढे सगळे अनधिकृत बांधकाम होत असताना सिडको प्रशासन व पोलीस प्रशासन यापैकी कुणालाही याबाबत अजिबात काही माहिती मिळत नाही व त्यांच्याकडून कुठल्याही प्रकारची कारवाई केली जात नाही हे आश्चर्यकारक असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच मध्यंतरी याच खारघर परिसरात या समाजाच्या इज्तिमा कार्यक्रमानंतर एक हिंदू बांधवाला जीवे मारण्याचा अनुचित प्रकार घडले आहे. त्यानंतर या परिसरांत प्रचंड तणाव निर्माण झाला होता व सामाजिक परिस्थिती पूर्णपणे विस्कळीत होण्याची परिस्थिती निर्माण झाली होती. या घटनेमुळे दोन्ही समाजांत प्रचंड तेढ निर्माण झाली होती व दंगलसदृष्य परिस्थिती झाली होती. त्यावेळी परिस्थिती आटोक्यात आणण्याकरिता पोलिस प्रशासन व लोकप्रतिनिधी यांना अथक परिश्रम घ्यावे लागले होते. अशातच आता सेक्टर १४ मधील कब्रस्तानच्या जागेचा अवैधरित्या मशिद व धार्मिक कार्याकरीता जो विनदिक्कत वापर होत आहे त्याबद्दल अन्य समाजात प्रचंड राग आहे व त्यासंदर्भात तेथील स्थानिक पदाधिकारी व नागरिकांनी वारंवार पाठपुरावा करूनसुद्धा प्रशासनामार्फत अद्यापही कोणतीच कारवाई केली जात नाही, हे खेदजनक आहे. त्यामुळे प्रशासनातर्फे अजुनही दिरंगाई झाली तर त्या ठिकाणी दोन्ही समाजांमध्ये काहीतरी अनुचित प्रकार होऊन सार्वजनिक शांतता बिघडण्याची व कायदा व सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे. वारंवार तक्रारी करूनही कब्रस्तानसाठी दिलेल्या जागेवर खारघरचे रहिवासी नसलेल्या लोकांकडून नमाज पठण केले जाते व त्याच माध्यमातून एका समाजाला सातत्याने डिवचण्याचा प्रयत्न करणे हे प्रकार थांबविण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे यासंदर्भात पोलीस प्रशासनाकडून योग्य ती कारवाई करून कब्रस्तानाचे अवैधरित्या मशिदीत रूपांतर करणाऱ्या संबंधित ट्रस्टींवर व त्यांना पाठबळ देणाऱ्या व्यक्तींवर तातडीने कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोलीस आयुक्त मिलिंद भांबरे यांच्याकडे केली आहे.

# इंद्रराज कनिष्ठ महाविद्यालयात इ. बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड -** इंद्रराज कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात नुकत्याच झालेल्या उच्च माध्यमिक अर्थात इयत्ता बारावी च्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ महाविद्यालयात नुकताच उत्साहात पार पडला. या समारंभात, विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट यश संपादन केल्या बद्दल त्यांचा सत्कार व कौतुक करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव अशोक देवरे तर प्रमुख पाहुणे म्हणून योगेश रोजेकर उपस्थित होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. बी. लांब आणि उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. सत्कार करण्यात आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यामध्ये कु. केसरे तनश्री , सुरडकर वैष्णवी, सुरडकर ललित, पोफळे वैष्णवी, इंगळे साक्षी, तांबट प्रथमेश, पवार गायत्री, जाधव रितेश, फाळके ईश्वर, पेहरकर तेजस,



शेवरले पायल आदींचा समावेश आहे. या सर्वांचे व त्यांच्या पालकांचे मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.यावेळी प्रमुख पाहुणे श्री. योगेश रोजेकर यांनी 100% निकालाबद्दल महाविद्यालयाचे कौतुक केले व सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांना त्याबद्दल शुभेच्छा दिल्या. यावेळी काही विद्यार्थ्यांनी व पालक यांनी आपले मनोगत व्यक्त केले व महाविद्यालयाचे आभार मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोमनाथ घार्गे यांनी अहिल्यानगर पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला..!! अहिल्यानगर जिल्ह्याचा दांडगा अनुभव

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी संतोष लांडे**

अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची बृहन्मुंबई येथे पोलीस उप-आयुक्त पदी बदली झाली आहे, त्यांच्या जागी रायगडचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची नियुक्ती झाली असून. त्यांनी शुक्रवारी दुपारी पोलीस अधीक्षक म्हणून मावळते राकेश ओला यांच्याकडून पदभार स्वीकारला आहे, सोमनाथ घार्गे यापूर्वी श्रीरामपूर येथे 2008 ते2009 या कालावधीत पोलीस उपाधीक्षक म्हणून काम केले होते त्यांचा कार्यकाळ त्यांनी दरोडा प्रतिबंधक पथकांचे नेतृत्व केले आणि पापड्या काळ्या टोळीचा पर्दाफाश करून गुन्हेगारीला आळा घालण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती. घार्गे यांचा अनुभव आणि त्यांची गुन्हेगारी विरोधी रणनीती त्यामुळे ते अहिल्यानगरच्या पोलीस प्रशासनाची योग्य निवड मानली जात आहे. राकेश ओला यांनी ऑक्टोबर 2022 मध्ये अहिल्यानगरचे जिल्हा पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला होता, त्यांनीही आपल्या दोन वर्षाच्या कार्यकाळात जिल्ह्यात कायदा आणि



सुव्यवस्था राखण्यात नेहमीच प्रयत्नशील राहिले, जिल्ह्यात गंभीर गुन्ह्यांचा तपास जलद गतीने करीत अनेक आरोपींना अटक केली खून,दरोडे यासारख्या गुन्हेगारीवर त्यांनी विशेषत लक्ष केंद्रित केले होते, त्यांनी आपल्या कार्यकाळात जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्था राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावली होती, नूतन पोलीस अधीक्षक घार्गे हे मूळचे सातारा जिल्ह्यातील असून अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक नियुक्ती म्हणून अहिल्यानगरच्या पोलीस प्रशासनासाठी नव्या संधी आणि आव्हानांचा कालावधी ठरणार आहे त्यांचा अनुभवाचा फायदा ठेवणे आणि सामान्य नागरिकांना नियंत्रण ठेवणे आणि सामान्य नागरिकांना सुरक्षित वातावरणात प्रदान करणे हे त्यांच्यासमोर मोठे आव्हान असणार आहे,*

# सत्यगाव शिवारातील युवकाच्या खुनाचा छडा; दोन आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेचा ताबा

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडंगे**

**विंचूर :-** येवला तालुक्यातील सत्यगाव शिवारातील उसाच्या शेतात २१ मे रोजी सापडलेल्या युवकाच्या खुनाचा उलगडा करण्यात स्थानिक गुन्हे शाखेला यश आले असून, या प्रकरणी दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे. सदर मृतदेह दहिवाडी (ता. सिन्नर) येथील संतोष दत्तात्रय शेळके (वय २७) याचा असल्याचे तपासात स्पष्ट झाले. आरोपींनी डोक्यावर व चेहऱ्यावर दगड मारून संतोषचा निर्घृण खून केला होता. याप्रकरणी येवला पोलीस ठाण्यात भादंवि कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. गुन्ह्याचा तपास पोलिस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर व तेगबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू होता. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक रविंद्र मगर व येवला पो.ठा. चे पो.नि. संदीप मंडलीक यांच्या नेतृत्वाखालील पथकाने मृताच्या हालचालींचा मागोवा घेतला. त्यादिवशी मृत संतोष शेळके हा दोन व्यक्तींसोबत वाकद-शिरवाडे मार्गावर गेल्याची माहिती मिळाल्यानंतर संशयितांचा शोध सुरू करण्यात आला. तपासादरम्यान विशाल रतन बागले (वय १९) आणि गणेश भगवान सोनवणे (वय २५, दोघेही रा. चासनळी, ता. कोपरगाव, जि. अहिल्यानगर) यांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी पूर्ववैमनस्यातून खून केल्याची कबुली दिली. या कामगिरीत सपोनि संदेश पवार, नवनाथ सानप, पो.अं. विनोद टिळे, सुधाकर बागुल, योगिता काकड, हेमंत गिलबिले, प्रदीप बहिरम, विशाल आव्हाड, रविंद्र गवळी, प्रल्हाद पवार, राजेंद्र पाटील, सचिन वैरागर, सागर बनकर व पंकज शिंदे यांनी सहभाग घेतला.



# तासवडेतील केमिकल कंपनीत सापडले 6.35 कोटींचे कोकेन पोलीस अधीक्षक तुषार दोशी यांची माहिती

## 3 जण ताब्यात कंपनी मालक तेलंगणा पोलिसांच्या ताब्यात | केमिकल कारखान्यात सापडलं कोकिन नावाचा अमली पदार्थ.

### उपविभागीय पोलीस अधिकारी कराड विभाग कराड व तळबीड पोलीस ठाणे जि. सातारा यांनी संयुक्तपणे छापा कारवाई करुन अंमली पदार्थ कोकेन केले जप्त

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी: संतोष लांडे**

**कराड :** मौजे तासवडे ता. कराड गावचे हददीतील तासवडे एम. आय. डी. सी. परिसरातील केमीकल कारखान्यावर कारवाई करुन ६,३५,००,०००/- रुपये किंमतीचा १.२७० कि. ग्रॅ. वजनाचे कोकेन जप्त सातारा जिल्हा पोलीस दलामध्ये अंमली पदार्थ विरोधी मोहिम प्रभाविपणे राबविण्या बाबत पोलीस अधीक्षक व अपर पोलीस अधीक्षक यांनी सूचित केलेले आहे. त्यानुसार कराडचे उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अमोल ठाकूर यांनी त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांना सुचना दिलेल्या आहेत. सहा. पोलीस निरीक्षक श्री. किरण भोसले यांना बातमीदारा मार्फत बातमी मिळाली कि, तासवडे ता. कराड गावचे हददीतील तासवडे एम. आय. डी. सी. मधील सुर्यप्रभा फॉर्माकम या कंपनी मध्ये अंमली पदार्थाची साठवणूक व निर्मीती होत आहे. श्री. अमोल ठाकूर उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे आदेशान्वये सपोनि किरण भोसले यांच्या अधिपत्याखाली उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय कराड व तळबीड पोलीस ठाणेचे संयुक्त पथकाने छापा कारवाई करुन कंपनीत एकुण १.२७० कि. ग्रॅ. वजनाचे ६,३५,००,०००/- रुपये किंमतीचा कोकेन हा अंमली पदार्थ फॉरेन्सिक सपोर्ट टिमचे मदतीने ताब्यात घेवून जप्त करण्यात आलेला आहे. सदर बाबत पोलीस कॉन्स्टेबल अभय मोरे यांनी सरकार तर्फे तळबीड पोलीस ठाण्यात तक्रार दिली असून गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कारवाई मध्ये कंपनी मधील तीन इसम नाव (१) समीर सुधाकर पडवळ, रा. मलकापूर ता. कराड (केमीस्ट) (२)



रमेश शंकर पाटील, रा. मल्हारपेठ ता. पाटण (३) जीवन चंद्रकांत चव्हाण रा. आवर्डे ता. पाटण यांना ताब्यात घेण्यात आले आहे. तसेच इतर आरोपी नाव (४) अमरसिंह जयवंत देशमुख, रा. नांदगाव ता. जि. सातारा (कंपनीचा मालक) एन.डी.पी.एस. गुन्हयामध्ये तेलंगणा पोलीस यांचे कोठडीत आहे. (५) विश्वनाथ शिपनकर रा. दौंड जि. पुणे याचा शोध सुरु आहे. गुन्हयाची व्याप्ती गांभीर्य लक्षात घेता विशेष तपास पथक गठीत करणेत आलेले आहे. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तुषार दोशी, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. वैशाली कडुकर, यांचे मार्गदर्शना खाली श्री. अमोल ठाकूर उपविभागीय पोलीस अधिकारी, स. पो. नि. किरण भोसले, अमीत बाबर, पोलीस उप निरीक्षक साक्षात्कार पाटील, सतिश आंदेलवार, ग्रेड पोउनि श्री. काळे, स. फौ. शशिकांत खराडे, पोलीस हवालदार शहाजी पाटील, योगेश भोसले, आंनदा रजपूत, गोरखनाथ सांळुखे, पोलीस कॉन्स्टेबल निलेश विभुते, अभय मोरे, सुंशात कुंभार, महेश शिंदे, प्रविण गायकवाड, गणेश राठोड, ऋषिकेश वेल्हाळ महिला पोलीस अंमलदार विनया वाघमारे, रत्ना कुंभार, शितल मोहिते तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयाकडील स. फौ. संतोष सपाटे, दिनेश घाडगे, पोलीस हवालदार असिफ जमादार, संताजी जाधव, प्रशात चव्हाण, प्रविण पवार, पोलीस नाईक सागर बर्गे, दिपक कोळी, पोलीस कॉन्स्टेबल मयुर देशमुख, अनिकेत पवार, वैभव पवार, सुरज चिंचकर, अमोल फल्ले, राजाराम बाबर तसेच फॉरेन्सिक विभागाचे पोलीस हवालदार प्रशात ताटे, दिनानाथ जाधव तसेच इंटरशिप करणारे प्रशिक्षणार्थी शंभुराज सांळुखे व आदित्य लोंढे सायबर पोलीस ठाणेचे पोलीस कॉन्स्टेबल रणजित कुंभार, प्रशात मोरे, ओकांर डुबल, सुशांत घाडगे यांनी केलेली आहे.

# अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या व्यक्तीस गुप्त बातमीच्या आधारे नागपूर गुन्हे शाखेने केली अटक.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी: संतोष लांडे**

नागपूर, दि. २२मे २०२५ रोजी नागपूर गुन्हे शाखेस विश्वसनीय गुप्त बातमीदारांने माहिती दिली की मंगलमुर्ती स्किमच्या बाजुला परसोडी येथे खुशाल मेश्राम वय अं. ३५ वर्ष रा. परसोडी हा त्याच्या जवळील काळया रंगाच्या कापडी थैलीमध्ये अंमलीपदार्थाची विक्री करत असल्याची माहिती प्राप्त झाली होती.सदर गुप्त माहितीची शहानिशा करण्यासाठी पोलीस ठाणे बेलतरोडी येथील तपास पथकांचे अधिकारी व अंमलदार यांनी मागील आठ दिवसापासुन पाळत ठेवलेला उपरोक्त नमुद ईसम हा अंमली पदार्थांची विक्री करीत आहे किंवा कसे याबाबतची शहानिशा झाल्यानंतर दि. २२मे २५ सां. ०६.३० वा. दरम्यान मंगलमुर्ती स्किमच्या बाजुला परसोडी येथे




सापळा रचुन खुशाल शत्रुघ्न मेश्राम वय ३४ वर्षे रा. पाण्याच्या टाकीजवळ परसोडी श्रमीक नगर झोपडपट्टी नागपूर यास मोठ्या शिताफीने ताब्यात घेवुन त्यास तुझ्याकडे गांजा नावाचा अंमली पदार्थ असल्याबाबत गुप्त माहिती प्राप्त झाली असुन आम्हाला एन.डी.पी.एस. कायदयान्वे अंगझडती घ्यावयाची आहे असे सांगितल्यावरून त्यांने त्यांच्याकडे असलेला गांजा या अंमली पदार्थ मोकळया मैदानामध्ये एका गोंधनचे झाडाखाली असलेल्या पळसाचे झाडाचे झुडपाकडे लपवुन ठेवल्याचे सांगुन त्या ठिकाणावरून एक काळ्या रंगाची कापडी पिशवी काढुन दिली असता सदर पिशवीमध्ये उग्र वास येत असलेला गांजा भरून लपवुन ठेवला असल्याचे दिसुन आल्यावरून सदरचा गांजा ताब्यात घेवुन त्याचे सोबतच्या वजन काट्याने वजन केले असता त्याचे वजन २ किलो ३९९ गॅम अं. कि० ३६०००/- किमतीचे मिळून आल्याने पंचासमक्ष जप्त करून आरोपी विरूध्द पोलीस ठाणे बेलतरोडी येथे २८०/२५ क. २० एन.डी.पी. एस कायदयान्वये गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद गांजा बाळगणारा आरोपी खुशाल शत्रुघ्ण मेश्राम याचे विरूध्द पोलीस ठाणे अंबाझरी, बेलतरोडी सोनेगांव येथे गुन्हा नोंद असुन आरोपी हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा असुन आरोपी सदर गुन्हयात तात्काळ अटक करण्यात आलेली आहे. आज रोजी नमुद आरोपीताचा पी.सी. आर. घेवुन गांजा कोठुन आणाला याबाबत तपास करून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदरची उत्कृष्ठ कारवाई ही मा. रश्मिता राव एन. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ४ नागपुर व मा. श्री नरेंद्र हिवरे, सहायक पोलीस आयुक्त साो. अजनी विभाग नागपुर शहर यांचे मार्गदर्शनामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक मुकुंद कवाडे, पोलीस निरीक्षक रूपाली बावणकर, सपोनि राम कांडुरे, पोउपनि किशोर मालोकार, गभणे सपोउपनि नंदु तायडे, अनिल गढवे, तपास पथकाचे पो. हवा. सुहास शिंगणे, सुमेंद्र बोपचे, रविंद्र आकरे, पोलीस अंमलदार विवेक श्रीपाद, मंगेश प्रमोद भिवगडे, योगेश यांनी गोपनीय माहितीच्या आधारे सदरची उत्कृष्ठ कार्यवाही केली.

# भरवस फाटा येथे आराध्या इलेक्ट्रिकल्स दुकान चार चोरट्यांनी फोडले चोर सीसीटीव्ही मध्ये कैद




**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**

**विंचूर :-** निफाड तालुक्यातील भरवस फाटा येथील पंकज बनकर यांचे दुकान आराध्या इलेक्ट्रिकल्स चार चोरट्यांनी रात्री एकच्या सुमारास दुकानाचे शटर तोडून आतमध्ये प्रवेश केला स्पीकर व काही इलेक्ट्रिकल्स पार्ट अंदाजे 1लाख चा मुद्देमाल 2500 हजार रोख रक्कमही चोरट्यांनी लंपास केली त्यानंतर त्यांनी मोर्चा वळवला कैलास रंगनाथ डुंबरे यांच्या घराकडे तेथून CT 100 गाडी नंबर MH 15 EF 5358 ही गाडी चोरट्यांनी पळवली काही वेळाने तेथून दोन युवक जात असताना त्यांना दुकानाचे शटर तुटण्याचे समजले व त्यांनी बनकर यांना ही माहिती दिली व बनकर आले असता त्यांनी हा प्रकार सगळा बघितला त्यानंतर त्यांनी लासलगाव पोलीस ठाणे यांना रात्री 2 वाजता माहिती दिली पोलीस प्रशासन तात्काळ येथे पोहोचले काही दिवसापासून विष्णुनगर, विंचुर, लासलगाव परिसरात घरफोडया होत आहे परंतु कुठल्याही चोरट्यांचा अजून तरी शोध लागलेला नाही आराध्या इलेक्ट्रिकल्स दुकान फोडताना हे चोरटे सीसीटीव्ही मध्ये कैद झाले आहे आता चोरटे पोलीस प्रशासनाने हाती लागतात का हे बघणे महत्त्वाचे आहे लवकरात लवकर शोध घेऊन अटक करावी असे ग्रामस्थांकडून मागणी होत आहे

पोलीस सहाय्यक निरीक्षक भास्कर शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार नवनाथ नाईकवाडे व किशोर लासुरकर तपास करीत आहेत

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

**daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle**

## 100 दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेत समाज कल्याण विभागात मुंबई विभाग अग्रेसर..

**दैनिक युवक अध्यक्ष**
**नवी मुंबई/ प्रतिनिधी**



**मुंबई** .मुख्यमंत्री ना .देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केलेल्या 100 दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचे निकालात समाज कल्याण विभागात मुंबई विभाग अग्रेसर ठरला आहे अशी माहिती श्री बाळासाहेब सोळंकी प्रादेशिक उपयुक्त समाज कल्याण मुंबई विभाग यांनी दिली. 100 शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा विशेष मोहिमेचे दुसऱ्या टप्प्याचे निकाल काल जाहीर झाले. त्या निकालामध्ये समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक स्तरावर प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग या कार्यालयाने द्वितीय क्रमांक पटकावला आहे, तर सहाय्यक आयुक्त स्तरावर सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रत्नागिरी या कार्यालयाने सुद्धा द्वितीय क्रमांक पटकावला आहे. मुंबई विभागाने केलेल्या केलेल्या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रशासकीय सुधारणा मोहिमेमध्ये प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभागाच्या सर्व कार्यालयांनी सहभाग नोंदवला होता . मुंबई विभागाच्या
सहाय्यक आयुक्त समाज कल्याण मुंबई शहर उपनगर ठाणे पालघर रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग या कार्यालय , आणि जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती कार्यालय मुंबई शहर उपनगर ठाणे पालघर रायगड रत्नागिरी सिंधुदुर्ग यांनी मोहिमेमध्ये सहभाग घेतला होता. स्वच्छ कार्यालय, अभ्यासतांसाठी सुसज्ज अभ्यागत कक्ष, योजनांचे दिशादर्शक माहिती फलक, नाविन्यपूर्ण योजना, नागरिकांसाठी करण्यात आलेल्या सुविधा इत्यादी निकषावर प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण मुंबई विभाग व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण रत्नागिरी या कार्यालयाने बाजी मारली. यापुढे सुद्धा समाज कल्याण विभागाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचण्यासाठी सर्व कार्यालयामार्फत विशेष प्रयत्न केले जातील अशी माहिती श्री बाळासाहेब साळुंके प्रादेशिक विभाग समाज कल्याण मुंबई विभाग यांनी यावेळी दिली. फडणवीस यांनी जाहीर केलेल्या 100 दिवस प्रशासकीय सुधारणा मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्याचे निकालात समाज कल्याण विभागात मुंबई विभाग अग्रेसर ठरला आहे अशी माहिती श्री बाळासाहेब सोळंकी प्रादेशिक उपयुक्त समाज कल्याण मुंबई विभाग यांनी दिली.

## प्रदीप वाफारे यांचा अर्ज अपात्र ठरवण्याचा आदेश कायम; उच्च न्यायालयात जाण्याचा निर्णय

**दैनिक युवक आधार**
**मुंबई |वार्ताहर**

१६ मे २०२५: जीएस महानगर को-ऑप. बँक लिमिटेड, मुंबईच्या संचालक मंडळासाठी २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीसाठी होत असलेल्या निवडणुकीत अर्जदार श्री. प्रदीप वाफारे यांचा अर्ज अपात्र ठरवण्यात आला होता. संबंधित निर्णयाविरोधात श्री. वाफारे यांनी सहकार अपील प्राधिकरण, पुणे येथे दाद मागितली होती. प्रकरणाचा सविस्तर आढावा घेतल्यानंतर दिनांक ०७ मे २०२५ रोजी अपील अधिकाऱ्यांनी श्री. वाफारे यांचा अपील अर्ज फेटाळत बँकेच्या निर्णयाला दुजोरा दिला आहे. मुख्य मुद्दा म्हणजे अर्जदाराने नामनिर्देशन अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये आवश्यक माहिती वेळेत सादर केली नव्हती. तसेच अर्जदार बँकेचा कर्जदार नसला पाहिजे असे बँकेच्या उपविधी मंजूर करण्यात आला आहे असे सांगण्यात आले आहे सर्व सभासदांना याची कल्पना सुद्धा नाही आहे बँकेचे मूळ उद्दिष्ट कर्ज देणे व घेणे आहे मग बँकेचा संचालक कर्जदार का नसावा बँकेचा कर्जदार असावा पण तो थकीत किंवा डिफॉल्टर नसावा हा हायकोर्टाचा निर्णय आहे .असा दावा केला असला तरी, संचालक पात्रतेसाठी अपेक्षित अटींचे पालन न झाल्याचे नमूद करण्यात आले. प्राधिकरणाच्या निर्णयानंतर अर्जदाराने पुढील न्यायालयात जाण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांचा दावा आहे की, त्यांनी सर्व अटी पूर्ण केल्या असून, निवडणूक प्रक्रियेतून अपात्र ठरवण्याचा निर्णय अन्यायकारक आहे. त्यामुळे आता हे प्रकरण उच्च न्यायालयात जाण्याची शक्यता आहे. या बँकेच्या निवडणुका नेहमीच चर्चेचा विषय राहिल्या असून, या निर्णयामुळे सहकारी क्षेत्रात वर्तुळात उत्सुकता निर्माण झाली आहे. आगामी काळात या प्रकरणाचा पुढील कायदेशीर प्रवास पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

## आकांक्षा पुढती तिथे गगन ठेंगणे...! संसार सांभाळत गोवळकोट येथील मनीषा बांद्रे यांचे दहावीत यश

**दैनिक युवक आधार**

**चिपळूण (प्रतिनिधी)-** महिलांना अनेक कारणांमुळे शिक्षण अर्धवट सोडावे लागते. यातीलच एक गोवळकोट येथील सौ. मनीषा वसंत बांद्रे. २५ वर्षांपूर्वी त्यांनी सातवीत शाळा सोडली. लग्न झालं. संसार सुरू झाला. संसारासाठी स्वतः नोकरी सुरू केली, परंतु शिक्षणाचे महत्त्व कुठेतरी कळलं आणि यंदा त्यांनी दहावीची परीक्षा दिली. संसार सांभाळत अभ्यास केला, कुठलाही क्लास लावला नाही आणि दहावीच्या परीक्षेत ४५ टक्के मार्क मिळवत त्यांनी आकांक्षा पुढचे जिथे गगनही ठेंगणे, हे सार्थ ठरवून दाखवले आहे. शिकण्याची जिद्द असली की, माणूस यश मिळवतोच, याचं मूर्तीमंत उदाहरण मनीषा बांद्रे यांनी दाखवून दिले आहे. २५ वर्षांपूर्वी त्यांनी सातवीत शाळा सोडली. मग पुढे लग्न झालं. तीन मुलं झाली. मोठी मुलगी बारावीला, तर दुसरी मुलगी दहावीत शिकत आहे. मुलगा सहावीमध्ये शिक्षण घेत आहे. पती वसंत बांद्रे हे नगर पालिकेमध्ये सफाई कर्मचारी म्हणून काम करीत आहेत. संसाराचा गाढा रेटण्यासाठी त्याही शहरातील विठाई हॉस्पिटलमध्ये नोकरी करतात. शिक्षणाची ओढ असणाऱ्या मनीषा बांद्रे यांना आपले शिक्षण कमी आहे, ही गोष्ट स्वस्थ बसू देत नव्हती. त्यामुळे त्यांनी यंदा दहावीची परीक्षा देण्याचा निर्णय घेतला. तीन मुलांचे शिक्षण, स्वतःची नोकरी, असा संसार सांभाळत त्यांनी दहावीची परीक्षा दिली. घरच्या घरी अभ्यास सुरू केला. कुठलाही क्लास लावला नाही आणि सातत्य, जिद्द, प्रामाणिक प्रयत्न या बळावर त्यांनी दहावीत ४५ टक्के गुण मिळवले. मनीषा बांद्रे यांनी मिळवलेले दहावीतील हे यश खरोखरच कौतुकास्पद आहे. संसार सांभाळत चाळीशीनंतर दहावीच्या परीक्षा उत्तीर्ण होत त्यांनी खरोखरच महिलांपुढे एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

# आमदार शेखर निकम यांचा २६ मे रोजी चिपळूण शहर पाहणी दौरा

### पूर, दरडग्रस्तसह विविध १९ ठिकाणी अधिकारी वर्गासह भेट देणार पावसाळ्याच्या दृष्टीने तयारी

**दैनिक युवक आधार**
**चिपळूण (प्रतिनिधी)**

दरवर्षी पावसाळयात उदभवणारी पूर समस्या, तुंबणाऱ्या नाल्यांमुळे पाणी निचरा होण्यास येणाऱ्या अडचणी, दरडग्रस्त भाग आणि शहरात सुरू असलेल्या विकासकामीं सध्यस्थिती लक्षात घेऊन त्यादृष्टीने उपाययोजना करण्यासाठी आमदार शेखर निकम हे दिनांक २६ मे रोजी अधिकाऱ्यांना घेऊन दिवसभर शहरात दौरा करणार आहेत. शहरात सकाळी १०.३० वाजल्यापासून सुरू होणाऱ्या या दौऱ्यात शहरातील एकून १९ ठिकाणे निवडण्यात आली असून या प्रत्येक ठिकाणी ते भेट देणार आहेत. गेल्या काही वर्षांपासून अतिवृष्टीमुळे चिपळूण शहरात पुरसदृश्य निर्माण होते. यामध्ये २१ जुलै २०२१ रोजी तर अतिवृष्टीमुळे चिपळूण



शहरासह ग्रामीण भागाला महापुराचा फटका बसला. चिपळूणवासीयांचे होत्याचे नव्हते झाले. यामुळे दरवर्षी आपत्ती व्यवस्थापन आराखडा बनवला जातो. या अनुषंगाने बैठका देखील होतात. यावर्षी आ. शेखर निकम यांनी पुढाकार घेत पावसाच्या दृष्टीने तयारी म्हणून चिपळूण शहरात पाहणी दौरा करणार आहेत. त्यानुसार सोमवार दिनांक २६ मे रोजी सकाळी १०.३० वाजता बहादूरशेखनाका येथून त्यांच्या या दौऱ्याला प्रारंभ होणार आहे. येथील तोडण्यात आलेल्या जून्या पुलामुळे गणेश विसर्जनाचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यावर तेथे घाट बांधण्यासह करण्यात येणाऱ्या उपाययोजनांबाबत पाटबंधारे व बांधकाम विभागाया अधिकाऱ्यांबरोबर पाहणी करणार आहेत. त्यानंतर वांगडे मोहल्ला येथे एस.टी. शेड मारणे आणि तेथील पाणी निचऱ्याची पाहणी करणार आहेत. त्यानंतर कराड रोडवरील बीएसएनएल ऑफीस, परांजपे स्किम, डी.बी.जे महाविद्यालय महामार्ग सव्हीस रोड, जिप्सी कॉर्नर, वडनाका, चिंचनाका, मध्यवर्ती बसस्थानक, पार्कींग बांधकाम पाहणी, विरेश्वर कॉलनी, पेठमाफ नाईक पूल, बाजारपेठ खेराडे कॉम्लेक्स, मुरादपूर गणपती मंदिर आदी ठिकाणी पाणी निचऱ्याची समस्या असल्याने या ठिकाणीं प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. दरम्यान खेंड महालक्ष्मीनगर, कांगणेवाडी दुर्गआळी, गोवळकोट आदी दरड कोसळणाऱया ठिकाणी तर पेठमाप गाळ उपसाबरोबरा दुरूस्ती करण्यात आलेल्या एन्रॉन पुलाची ते या दौऱ्यात पाहणी करणार आहेत. त्याबरोबर शहरासाठी उपलब्ध करून दिलेल्या निधीतून साकारत असलेल्या विविध विकासकामीं सध्यस्थितीही या भेटीत पाहणीवेळी जाणून घेणार आहेत. या दौऱ्यानंतर ते शहरासाठी ते आढावा बैठक घेऊन आवश्यक त्या उपाययोजनांसाठीच्या सुचना सबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना देणार आहेत. या दौऱ्यात नगरपरिषद, पाटबंधारे, सार्वजनिक बांधकाम, राष्ट्रीय महामार्ग, एस.टी. आगाराचे अधिकारी सहभागी होणार आहेत.

# रिपब्लिकन पक्षाची येत्या २९ मे रोजी मुंबईत भारत जिंदाबाद यात्रा

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले नेतृत्व करणार

**दैनिक युवक आधार**
**पनवेलः(आनंद पवार)**

पाकिस्तान पुरस्कृत आतंकवादाचा खातमा करण्यासाठी सिंदुर ऑपरेशन यशस्वी केल्याबद्दल भारतीय सैन्याचा अभिमान आणि अभिनंदन व्यक्त करण्यासाठी,प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि भारतीय सैन्याला पाठिंबा देण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने मुंबईत येत्या २९ मे रोजी सकाळी ११:३० वाजता चैत्यभुमी ते इंदुमिल अशी भारत जिंदाबाद यात्रा केंद्रीय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वात काढण्यात येणार आहे.चैत्यभूमी येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विन्रम अभिवादन करुन ना.रामदास आठवले यांच्या नेतृत्वात भारत जिंदाबाद यात्रेला प्रारंभ करण्यात येणार आहे.चैत्यभुमी येथुन सुरु होणारी भारत जिंदाबाद यात्रा छत्रपती शिवाजी पार्क मैदान येथून मुख्य रस्त्याने येऊन इंदुमिल येथे भारत जिंदाबाद यात्रेचा समारोप होणार आहे. रिपब्लिकन पक्षाच्या मुंबई प्रदेशच्या वतीने गोराई बे व्हयु हॉटेल येथे आज भारत जिंदाबाद यात्रेच्या नियोजनाची बैठक आयेजित करण्यात आली होती.यावेळी रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.मुंबई प्रदेश अध्यक्ष सिध्दार्थ कासारे हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते.ऋषी चिंतामण माळी स्वागत अध्यक्ष होते.राष्ट्रीय सरचिटणिस अविनाश महातेकर, महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनावणे,बाळासाहेब गरुड विवेक पवार, ज्येष्ठ नेते कमलेश यादव श्रीकांत भालेराव,उत्तर मुंबई जिल्हा अध्यक्ष रमेश गायकवाड,अजित रणदिवे, संजय डोळसे तसेच अभया सोनवणे आदिंनी सभेत मार्गदर्शन केले. पाकिस्तानने सुरु केलेला आंतकवाद नष्ट करण्याचा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींचा निर्धार आहे.पाकव्याप्त काश्मिर भारताच्या ताब्यात घेतले पाहिजे.यासाठी पाकिस्ताशी थेट युध्द करावे लागले तरी चालेल.पाकिस्तान आणि पाक व्याप्त काश्मिरमधील अतिरेक्याचे अड्डे भारतीय सैन्याने मोठ्या शौर्याने उध्दवस्त केले.भारतीय सैन्याच्या पराक्रमाचा आम्हाला अभिमान आहे.आतंकवाद नष्ट करण्यासाठी पाकिस्तानला कायमचा धडा शिकवण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदीना देशभरातील दलितांचा पाठिंबा आहे.असे ना.रामदास आठवले म्हणाले. पाकिस्तानला धडा शिकवण्यासाठि भारतीय सैन्याला पाठिंबा देण्यासाठी रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रा येत्या २९ मे रोजी मुंबईत काढण्यात येणार आहे.दिनांक २९ मे रोजी सकाळी ११:३० वाजता दादर चैत्यभूमी येथे महामानव




डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना विन्रम अभिवादन करुन तिरंगा ध्वज हाती घेऊन भारत जिंदाबाद यात्रेला प्रारंभ होणार आहे.चैत्यभूमी ते छत्रपती शिवाजी महाराज पार्क मार्गाने इंदुमिल पर्यंत भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येणार आहे.या भारत जिंदाबाद यात्रेत रिपब्लिकन कार्यकर्त्यांनी आणी नागरिकांनी हाती तिरंगा झेंडा घेऊन भारत जिंदाबाद यात्रेत सर्वांनी सामील व्हावे असे आवाहन ना.रामदास आठवले यांनी केले आहे. दिनांक २९ मे नंतर मुंबईतील सर्व तालुक्यातील आणि जिल्हामध्ये रिपब्लिकन पक्षाच्या वतीने भारत जिंदाबाद यात्रा काढण्यात येणार आहे असे या बैठकीत निश्चित करण्यात आले आहे अशी माहिती ना.रामदास आठवले यांनी दिली आहे.

## चिखली:-कुदळवाडी-जाधववाडी आरक्षणामुळे भुमीहिन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, भाजपचे आमदार श्री महेश दादा लांडगे यांचा सक्रिय सहभाग व सहकार्य.

**दैनिक युवक आधार**
**शिवाजी वाघमारे**
**चिखली पुणे प्रतिनिधी**

**चिखली :-** शहर विकास आराखड्यातील कुदळवाडी - जाधववाडी क्षेत्रावरील राखीव आरक्षण उठवण्यासाठी मी शेतकऱ्यांचा बरोबर उभा आहे. असे भोसरी विधानसभेचे भाजपचे आमदार श्री महेश दादा लांडगे यांनी विश्वास दिला आहे . कुदळवाडी-जाधववाडी परिसरातील तब्बल १७५ एकरांवर सर्वात मोठे आरक्षण टाकण्यात आले आहे. तिन महिन्यांपूर्वी ४५०० अनाधिकृत बांधकामे व पत्राशेड पाडून हा संपूर्ण परिसर भुईसपाट करण्यात आला होता. या पाठोपाठ विकास आराखड्यातील ९०% टक्के क्षेत्रावर आरक्षण टाकण्यात आल्याने भुमीहिन शेतकरी हतबल झाले आहेत. या विषयावर गेल्या आठवड्यापासून काल पुन्हा एकदा दुसरी बैठक आयोजित करण्यात आली होती.हि बैठक श्री संत सावतामाळी मंदिरामध्ये पार पडली.श्री क्षेत्र टाळागावं - चिखली येथील ग्रामस्थांनी एक मिटिंग घेतली या मिटिंगमध्ये खरया अर्थाने महत्त्वाचा विषय म्हणजे नवीन डिपीमध्ये एसएसीसी हे आरक्षण टाकण्यात आले आहे एकुण १७५ एकरांवरच्या या आरक्षणामुळे चिखली, कुदळवाडी, जाधववाडी आहेरवाडी, रोकडे वस्ती मधील विवीध भागातील मुळ शेतकरी हे भूमीहीन होणार आहेत. या निर्णयाला विरोध दर्शविण्यासाठी सर्व स्थानिक शेतकऱ्यांनी एकत्रित बैठक घेतली ,सर्व शेतकऱ्यांनी या ठिकाणी जाहीर विरोध दर्शविला. भोसरी विधानसभेचे भाजपचे आमदार श्री महेश दादा लांडगे यांना त्यां ठिकाणी सर्व ग्रामस्थांनी निमंत्रित केले होते स्वतः भाजपचे आमदार श्री महेश दादा लांडगे उपस्थित होते आमदार साहेबांनी सर्व शेतकऱ्यांना दिलासा दिला, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी शेतकऱ्यांचा दोन पावलं पुढे असेल, अशी ग्वाही देत आहे . हे आरक्षण उठवण्या संदर्भात मी नक्कीच शेतकऱ्यांसाठी पाहिजे ती मदत करेल,भमिहिन शेतकऱ्यांना पुन्हा त्याच जमीनी रहिवासी झोनमध्ये कशा मिळतील या साठी मी सतत प्रयत्न करेल असे आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांना दिले. या मिटिंगमध्ये मोठ्या प्रमाणात भुमिहिन शेतकरी आणि त्याच बरोबर समस्त ग्रामस्थ व
टाळगाव -चिखलीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# शिवसेना शिष्टमंडळाची MSEB कार्यालयावर धडक

### वारंवार खंडित व अनियमित होणाऱ्या वीज पुरवठ्याबाबत अधिकाऱ्यांना विचारला जाब

**दैनिक युवक आधार**
**पेण वार्ताहर**
**किरण बांधणकर**

पेण तालुक्यासह रायगड जिल्हा व एकंदरीतच संपूर्ण कोकण विभागाला दरवर्षी मुसळधार पाऊस व वादळी वाऱ्याचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत ओव्हरहेड विजतारा तुटून पडण्याच्या आणि विजेचे खांब कोलमडून पडणे, झाडे वीज तारांवर पडून वीज खंडित होणे तसेच उघड्या वीज वाहिन्या नागरिकांच्या जीवाला धोका करीत आहेत. वारंवार वीज पुरवठा खंडित होणे, अपघात घडणे, शॉर्टसर्किट होणे यातून होणारी आर्थिक व सामाजिक हानी हे सगळे प्रकार जनतेच्या सहनशक्तीच्या सीमेला गेले आहेत.त्यामुळे यावर योग्य हालचाली व्हाव्या यासाठी शिवसेना ठाकरे गटाच्या शिष्टमंडळाने अधिकाऱ्यांची भेट घेऊन चांगलाच जाब विचारला. तसेच जीर्ण झालेले पोल बदलून त्या ठिकाणी



नवीन पोलाची उभारणी करणे, अस्तित्वात असलेल्या पुलावरील फॅब्रिकेशनचे दुरुस्ती आजपर्यंत झालेली नसून या पोलावर चढून फॅब्रिकेशनची दुरुस्ती करतेवेळी आपल्या महावितरण मधील कर्मचाऱ्यांचे अनेक वेळा अपघात झालेले आहेत याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी फॅब्रिकेशन दुरुस्तीचे काम त्वरित हाती घेण्यात यावे. विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा या अत्यंत खराब झालेल्या आहेत यामुळे सर्वे करून खराब झालेल्या तारा काढून नवीन तारा टाकाव्यात.पेण तालुक्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी महावितरणचे कार्यालय आहे त्या त्या ठिकाणी अहोरात्र विद्युत ग्राहकांच्या तक्रारी घेण्यासाठी व तक्रारींचे निवारण करण्यासाठी कायमस्वरूपी कर्मचाऱ्यांची आवश्यकता आहे. महावितरण मार्फत वीज ग्राहकांना मिळणारे नवीन विद्युत कनेक्शन हे कमीत कमी खर्चाने मिळाले पाहिजे .तसेच वीज ग्राहकांचे जळालेले मीटर किंवा बंद पडलेले मिटर हे आपल्या खात्यामार्फत कोणतीही आकारणी न लावता बदलून मिळाले पाहिजे .आपल्या खात्यामार्फत ग्राहकांना ८०० ते ८५० रुपये भरून विद्युत मीटर मिळण्याची सुविधा असताना आपले कर्मचारी ग्राहकांना बाहेरून मीटर घेण्याची सक्ती का करतात याची चौकशी होणे गरजेचे आहे.अशी मागणी शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी केली आहे.जर येत्या १० दिवसात याची पूर्तता नाही झाली तर आम्हाला आंदोलनात्मक भूमिका घ्यावी लागेल असे सांगण्यात आले आहे. यावेळी शिवसेनेचे पेण पनवेल कर्जत संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, समन्वयक नरेश गावंड, माजी सभापती संजय भोईर, पेण तालुका प्रमुख समीर म्हात्रे, घनश्याम कुथे, महिला आघाडीच्या दीपश्री पोटफोडे, युवा सेनेचे सुधीर ढाणे, चेतन मोकल, भगवान पाटील, राजू पाटील, वसंत म्हात्रे, दर्शना जवके, महानंदा तांडेल, मेघना चव्हाण, सुरेखा तांडेल, लव्हेंद्र मोकल, शिवाजी म्हात्रे, चंद्रहास म्हात्रे, विनोद म्हात्रे यांच्यासह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पनवेल महापालिकेची स्वच्छता ग्रह अस्वच्छच

### आरोग्य विभागाचे साफसफाई कडे दुर्लक्ष

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



नवीन पनवेल मधील शबरी हॉटेल शेजारी पनवेल महापालचे स्वच्छतागृह नेहमी अस्वच्छ असल्याने या स्वच्छतागृहात नागरिक जात नसल्याचे दिसत आहे त्यामुळे स्वच्छता ग्रह बांधून देखील त्याचा उपयोग होत नाही तिकडे पनवेल महापालिका स्वच्छता अभियानासाठी लाखो रुपये खर्च करत असताना या ठिकाणी पाहिजे त्या ठिकाणी रोज स्वच्छता होत नसल्याने नागरिकानी चिंता व्यक्त केली आहे पनवेल महापालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने ही परिस्थिती पहावयास मिळत आहे पनवेल नवीन पनवेल खांदा कॉलनी कामोठे खारघर या विभागात पनवेल महापालिकेने स्वच्छतागृह बांधली ही स्वच्छतागृह ठेकेदारमार्फत स्वच्छ केले जातात परंतु हे ठेकेदार कामाकडे नीट लक्ष देत नसल्याने या स्वच्छतागृहात नेहमी स्वच्छता नसते तरी संबंधित ठिकाणी कारवाई व्हावी अशी मागणी या परिसरातील नागरिक करत आहेत

# मान्सूनपूर्व तयारीचा वाशिम पॅटर्न: पुरस्थिती हाताळण्यासाठी यंत्रणा सज्ज

**दैनिक युवक आधार**
**रिसोड तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

**वाशिम,** जिल्हा प्रशासनाने येत्या मान्सून हंगामासाठी संपूर्ण तयारी केली असून संभाव्य पुरस्थिती हाताळण्यासाठी विविध उपाययोजना आणि यंत्रणा राबवण्यात आल्या आहेत. दि. ६ मे २०२५ रोजी जिल्हास्तरीय मान्सून आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये सर्व संबंधित विभागांना आवश्यक सूचना व आवश्यक ते निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हा व तालुकास्तरावर २४X७ नियंत्रण कक्ष सुरू करण्यात आले आहेत. राज्य आपत्कालीन राखीव दल नागपूर पथकाच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण व मॉक ड्रिलचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातील ८३ गावांना पूराचा संभाव्य धोका असून त्या पार्श्वभूमीवर नागरिकांना स्थलांतरित करण्यासाठीच्या सुविधा, आपत्ती साहित्याची तपासणी आणि सज्जता पूर्ण करण्यात आली आहे. पुरामुळे बाधित होणाऱ्या भागांमध्ये ३०० आपत्ती मित्र, ४८ ॲम्ब्युलन्स, ३ बोट,



७ अग्निशमन वाहनांसह इतर यंत्रणा कार्यरत आहेत. सुरक्षिततेसाठी जीवनरक्षक साहित्य – १३३ लाईफ जॅकेट्स, १११ लाईफ रिंग्स, १८ सर्च लाईट्स, १८०० मीटर बचाव दोरी, ३ पोर्टेबल लाईट्स आदी साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. जिल्हा व तालुका स्तरावरील शोध व बचाव पथके सज्ज असून १०५ पोहणारे पोलीस कर्मचारी आपत्कालीन सेवा देण्यासाठी तत्पर आहेत. पुरस्थितीत नागरिकांनी घ्यावयाची काळजी, अफवांपासून दूर राहणे, महत्त्वाचे कागदपत्रे सुरक्षित ठेवणे, शुद्ध पाण्याचा वापर करणे अशा सूचना जनजागृतीद्वारे देण्यात येत आहेत. पुराच्या पार्श्वभूमीवर ४६ संरक्षक कामांना शासन मान्यता प्राप्त झाली असून ही कामे प्रगतीपथावर आहेत. एसओपी तयार करण्यात आले असून जनजागृतीसाठी पोस्टर व माहितीपत्रके वितरण करण्यात आले आहे. “मान्सूनपूर्व तयारीचा भाग म्हणून जिल्ह्यातील सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. प्रत्येक नागरिकाचे संरक्षण हे आमचे सर्वोच्च प्राधान्य आहे. संभाव्य आपत्तीला सामोरे जाण्यासाठी प्रशासनाने आवश्यक नियोजन आणि संसाधनांची सुनिश्चितता केली आहे. जिल्हाधिकारी बुवनेश्वरी एस जिल्हा प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, आपत्तीच्या वेळी शांतता राखावी, अधिकृत सूचनांचे पालन करावे आणि स्थानिक प्रशासनाशी सहकार्य करावे.
“जिल्ह्यात संभाव्य पुरपरिस्थितीचा विचार करून संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी घाबरून न जाता प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे. आपत्तीच्या प्रसंगी जलद प्रतिसाद आणि योग्य समन्वयासाठी आमचा प्रयत्न सातत्याने सुरू आहे”*
– *जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहु भगत

# लोकनेते दि. बा पाटील २७ गाव कमिटी व OCS या कंपनी च्या संयुक्त विद्यमाने कुशलकामगार भरती मेळावा

### बेरोजगार युवक व OCS संस्था मधील २७ गाव कमिटी प्रमुख दुआ..सुनील कटेकर

**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

प्रकल्पग्रस्त तरुणांसाठी लोकनेते दि.बा. पाटील २७ गाव कमिटी व OCS या कंपनी च्या संयुक्त विद्यमाने कुशलकामगार भरती मेळावा २४/५/२०२५ शनिवार रोजी,सकाळी 10 ते सायं 6 वाजेपर्यंत पर्यत रा.जी.प.शाळा चिचपडा R2 येथे लोकनेते .दी बा.पाटील नवी मुंबई अंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये OCS या कंपनी व्यवस्थापनाच्या वतीने तांत्रिक, अभियांत्रिकी ,पदवीधर , दहावी,बारावी व इतर कामगार भरती विषयी थेट मुलाखत घेण्यात आली.यात इलेक्ट्रिशियन-20 / ITI + PWD परवाना,वरिष्ठ व्यवस्थापक (इलेक्ट्रिकल)06 /इलेक्ट्रिकल अभियांत्रिकी मध्ये डिप्लोमा/पदवी, एचव्हीएसी (वातानुकूलन मध्ये हीटिंग व्हेंटिलेशन)20 / HVAC मध्ये ITI, वरिष्ठ व्यवस्थापक (इलेक्ट्रिकल) -04 / एचव्हीएसी इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा/पदवी आणि एचव्हीएसी (चिल्लर प्लांट)मध्ये १८ महिन्यांचा डिप्लोमा. प्लंबर 20/ प्लंबर मध्ये ITI सुतार 08 /आयटीआय किंवा सुतार
सिव्हिल 12 /सिव्हिलमध्ये आय.टी.आय




स्थापत्य अभियंता 06 सिव्हिल इंजिनिअरिंगमध्ये डिप्लोमा/पदवी प्लंबर इंजिनियर 03 / प्लंबिंगमध्ये आयटीआय अनुभव /डिप्लोमा अभियंता ३ वर्षांचा अनुभव किंवा पदवी अभियंता डी.जी. (डिझेल जनरेटर) ऑपरेटर 08 / इलेक्ट्रिकल मध्ये डिप्लोमा किंवा पदवीमोटर मेकॅनिक 118 / मोटर मेकॅनिकमध्ये आय.टी.आय फायर तंत्रज्ञ 22 / अग्निशमन मध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रमलिफ्ट तंत्रज्ञ 14 / इलेक्ट्रिशियन ट्रेडमध्ये ITI
MASON (गवंडी) /12
अश्या विविध पदांवर भरती प्रक्रियेच्या माध्यमातून निंदणी करण्यात आली होती. यावेळी शेकडो युवक ,युवतींनी या शिबिरात मोठ्या संख्येने भेट दिली. यावेळी लोकनेते दि.बा.पाटील २७ गाव कमिटी अध्यक्ष नंदराज मुंगाजी यांच्या नेतृत्वाखाली संस्थेचे सदस्य तसेच क्रियाशील प्रेस क्लब रायगड जिल्हा अध्यक्ष सय्यद अकबर व सचिव साबीर शेख व विविध सामाजिक ,राजकीय मंडळींनी शिबिरात हजेरी लावत रोजगार भरती मेळावा यशस्वी केला.

## घरावर कर्ज करून देतो सांगून 2,19,900/- ची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**

पोलीस ठाणे हद्दीत 02 डिसेंबर 2024 रोजी 11:00 वा ते दि. 06 डिसेंबर 2024 रोजी 11:00 वा च्या दरम्यान मौजे रोहा आयडिबीआय बॅक व आमडोशी येथे आरोपी रा. डोंबिवली याने फिर्यादी रा.आमडोशी, पो.पाटणसई, रोहा यांचा घर तारण ठेवुन 15,00,000/- रू. लोन करून देतो असे आश्वासन देवुन त्याकरिता चलन, रजिस्टेशन, डॉक्युमेंट व वकीलांची फी असे एकुण 1,60,000/- आरटीजीएस स्वरूपात व कमिशन 59,900/-रूपये गुगल पे स्वरूपात असे एकुण 2,19,900/- रूपये घेतले असून अद्यापपावेतो फिर्यादी यांना घर तारण ठेवुन मिळणारे लोन व फिर्यादी कडुन गुगल पे व आरटीजीएस स्वरूपात घेतलेले पैसे देखील परत न करता फिर्यादी यांची आरोपीत क्रं.01,02,03 यांनी आपआपसात संगनमत करून आर्थिक फसवणूक केली. याबाबत नागोठणे पोलीस ठाणे गुरनं.51/2025, भा.न्या.संहिता 2023 चे कलम 318(4), 3(5) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सहा.पो.नि. सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली पी.एस.आय. राजहंस नागदिवे हे करीत आहेत.

## पावसाळा व पूर परिस्थितीमुळे रेशन लाभार्थ्यांना जून ,जुलै ,ऑगस्ट २०२५ महिन्याचे रेशन एकत्रित मिळणार

दैनिक युवक आधार
संजीव भांबोरे
भंडारा वार्ताहर

आगामी येणारा पावसाळा लक्षात घेता परिणामी पूरजन्य परिस्थिती, प्रतिकूल हवामान कार्यक्रम लॉजिस्टिक्स, मालाची साठवणूक करिता येणाऱ्या अडचणी, लक्षात घेता राज्यातील सर्व सरकारी स्वस्त धान्य दुकानात अन्नधान्याची आगाऊ उचल करण्याच्या सूचना व मंजुरी केंद्राकडून प्राप्त झाल्याने राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांनी आगस्ट 2025 पर्यंत निश्चित केलेल्या रेशनच्या अन्नधान्याची उचल 30 मे पर्यंत करण्याचे निर्देश जारी करण्यात आलेले आहेत .राज्य शासनाच्या अन्न नागरी पुरवठा विभागाने काढलेल्या 9 मे रोजीचे आदेशात नमूद केले आहे की, पावसाळा तसेच पूर परिस्थिती, प्रतिकूल हवामान परिस्थितीमुळे अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. त्यामुळे



देशातील राज्य व केंद्रशासित प्रदेशांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेता लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वितरण करण्यासाठी राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांनी ऑगस्ट 2025 पर्यंत एन. एफ. एस .ए अंतर्गत वाटप केलेल्या अन्नधान्याचे आगाऊ विचार करण्यात केंद्र शासनाने मंजुरी दिली आहे .सदर अन्नधान्याची उच्चल व वाटप राज्यांनी 30 मे पर्यंत करण्याचे निर्देश दिले असल्याची

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेअंतर्गत भंडारा तालुक्यातील एकूण 174 दुकानात अंतोदय कार्ड योजनेचे 11,7,67 शिधापत्रिका व प्राधान्य कुटुंबाचे एकूण लाभार्थ 41575 यांना जून, जुलै ,ऑगस्ट असे एकूण तीन महिन्याचे धान्य त्यांना नेमून दिलेल्या स्वस्त धान्य दुकानातून माहे जून 2025 पासून तिन्ही महिन्याचे धान्य एकत्रित वाटप करण्यात येणार आहे.
पी आर कापडे निरीक्षण अधिकारी पुरवठा विभाग तहसील कार्यालय भंडारा

माहिती समोर आलेली आहे. त्यानुसार एन. एफ .एस. ए अंतर्गत ऑगस्ट 2025 पर्यंतची अन्नधान्याची वाटपाची कार्यवाही 30 मे पर्यंत करण्याचे आदेशात निश्चित केले असल्याची माहिती आहे .याबाबत शासन आदेश अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग मंत्रालय चे कक्ष अधिकारी महेश कानडे यांनी जाहीर केला असल्याची माहिती आहे.

## भुजबळांना संधी, ओबीसींना खुश करण्याची नांदी !

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका डोळ्यासमोर ठेवून छगन भुजबळ यांना राज्य मंत्रिमंडळात संधी दिल्याची चर्चा आहे. नुकताच सुप्रीम कोर्टाने राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका चार महिन्याच्या आत घेण्याचा निर्णय दिला. त्यामुळे राज्यातील महायुती सरकारने गेल्या पाच महिन्यापासून मंत्रिमंडळाबाहेर ठेवण्यात आलेल्या ओबीसी समाजाचे नेते छगन भुजबळांना त्याचा फायदा झाला असल्याची जोरात चर्चा आहे. त्यांची मंत्रीपदी झालेली ही नेमणूक म्हणजे ओबीसी समाजासाठी मोठे संकेत आहेत. राज्याच्या सत्ताकारणात सामाजिक समतोल राखण्यासाठी ही हालचाल कितपत प्रभावी ठरेल, हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल. मात्र, एवढं नक्की की, भुजबळांना मिळालेली संधी ही एका नव्या राजकीय समीकरणाची नांदी ठरू शकते.



## महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त मनविसे वतीने मूकबधिर शाळा व अनाथाश्रमात सेवा कार्य.

**दैनिक युवक आधार**
**यावल वार्ताहर**

आज शनिवार दिनांक २४ रोजी चोपडा तालुक्यात धानोरा येथे
महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमितसाहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रावेर लोकसभा मनविसे तर्फे सामाजिक बांधिलकी जपत मूकबधिर शाळा आणि अनाथाश्रम येथे विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांना आणि अनाथ बालकांना स्वादिष्ट भोजन वाटप करण्यात आले तसेच केक कापून अमितसाहेब ठाकरे यांचा वाढदिवस आनंदाने साजरा करण्यात आला.या उपक्रमात विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळाले. या प्रसंगी मनविसे रावेर लोकसभा जिल्हाध्यक्ष कल्पेश पवार,जिल्हा सचिव विष्णू कोळी,यावल तालुका अध्यक्ष ऋषिकेश पाटील,तालुका उपाध्यक्ष उदय पाटील,चोपडा तालुका अध्यक्ष गौरव सोनवणे, किशोर महाजन व योगेश कोळी यांची विशेष उपस्थिती लाभली. हा सामाजिक उपक्रम मनविसेच्या युवकांनी स्वखुशीने पार पाडला असून,अशा प्रकारच्या उपक्रमांतून समाजातील दुर्लक्षित घटकांपर्यंत आनंद पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न आहे.महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना नेहमीच अशा विधायक कार्यात अग्रेसर राहील, असा विश्वास या निमित्ताने व्यक्त करण्यात आला.






**दैनिक युवक आधार -** राष्ट्रीय सब ज्युनिअर, ज्युनिअर इक्विप पॉवरलिफ्टिंग स्पर्धा कोल्हापुर येथे सुरू आहे. त्या स्पर्धेच्या बक्षीस समारंभाची क्षणचित्र.अर्जुन पुरस्कार प्राप्त, आंतरराष्ट्रीय पंच, राष्ट्रीय Aसंधी प्राप्त झाली. याबाबत आनंद झाला. यासाठी महाराष्ट्र संघटनेचे सचिव शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त श्री संजय सर देसाई यांचे मनःपूर्वक आभार

## पुणे जिल्हा परिषद अधिकारी यांच्याकडून पालखी मुक्कामाची पाहणी

**दैनिक युवक आधार**
**सणसर विकास क्षत्रिय**

जगद्गुरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर भवानीनगर, सणसर येथील पालखी मुक्काम तळाची पाहणी शनिवारी 24 मे रोजी करण्यात आली.यावेळी पुणे जिल्हा परिषद अधिकारी गजानन पाटील, बारामती उपविभागीय अधिकारी वैभव नावडकर व विविध विभागांतील अधिकारी उपस्थित होते. त्यांचा ग्रामपंचायत सणसर चे सरपंच यशवंत नरुटे पाटील यांनी केला. जून महिन्यात संत तुकाराम महाराज यांचा पालखी सोहळा इंदापूर तालुक्यात येणार आहे.ही पालखी चार दिवस इंदापूर तालुक्यात मुक्कामी असते. इंदापूर तालुक्यातील पहिला मुक्काम सणसर येथे असतो. या ठिकाणी लाखो वारकरी तसेच सर्वसामान्य नागरिक या सोहळ्यात सहभागी होतात. पालखी सोहळा ज्या मार्गावरून येणार आहे,त्याची पाहणी पुणे जिल्हा परिषद अधिकारी गजानन पाटील,बारामती प्रांत अधिकारी वैभव नावडकर,गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनी पाहणी केली . या पाहणी दौऱ्यामध्ये पथ, विद्युत विभाग,घनकचरा यांसह पंचायत समिती विभागांचे प्रमुख विस्तार अधिकारी उपस्थित होते.रस्त्यांची सद्यःस्थिती ,आवश्यक सोयीसुविधा,स्वच्छता,विद्युत व्यवस्था याची पाहणी केली आहे,असे सणसर येथील ग्रामसेवक सचिन पवार यांनी दिली सांगितले



## AWL ॲग्री बिझनेस लिमिटेडची टेलिव्हिजन मोहीम

### फॉर्च्यून होल व्हीट ने महाराष्ट्र-गुजरात बाजारपेठांमध्ये 'शुद्धतेची खरी पारख' नावाची टेलिव्हिजन मोहीम सुरू केली

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी**

भारतातील अग्रगण्य फूड FMCG कंपन्यांपैकी एक असलेली AWL ॲग्री बिझनेस लिमिटेड (पूर्वीची अदानी विल्मर लिमिटेड) ने फॉर्च्यून होल व्हीटसाठी महाराष्ट्र आणि गुजरात या मुख्य बाजारपेठांमध्ये 'शुद्धतेची खरी पारख' नावाची समर्पित टेलिव्हिजन मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम ग्राहकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी आणि पॅकेज्ड होल व्हीट विभागात उच्च दर्जा पुरवण्याच्या ब्रँडच्या वचनबद्धतेला अधोरेखित करण्यासाठी सुरू करण्यात आली आहे. जे ग्राहक पूर्वापारपणे सुटा गहू खरेदी करतात अशा चोखंदळ ग्राहकांना एका विश्वासार्ह राष्ट्रीय ब्रँडकडून एक सातत्यपूर्ण आणि उच्च दर्जाचा पर्याय सादर करत सहभागी करून घेण्यासाठी हा उपक्रम विशेषतः डिझाइन केला गेला आहे. ही TVC एका आपल्या नेहमीच्या किराणा दुकानात चित्रित करण्यात आली आहे. तिथे एक उत्सुक तरुण मुलगी गव्हाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न विचारते आणि त्यातून फॉर्च्यून होल व्हीटच्या उत्कृष्ट वैशिष्ट्यांवर आधारलेली एक प्रभावी कथा साकारते. या फिल्मद्वारे ग्राहकांना सारखेपणा असलेले धान्य, त्याचा आकार, रंग, आणि ताकद यातून दर्जेदार होल व्हीटची स्पष्ट ओळख पटवून दिली जाते. या गोष्टी फॉर्च्यूनला पॅकेज्ड होल व्हीट विभागात सर्वोच्च मापदंड म्हणून प्रस्थापित करतात. श्री. मुकेश मिश्रा, सीनियर व्हाईस प्रेसिडंट, बिझनेस हेड, सेल्स- मार्केटिंग विभाग AWL ॲग्री बिझनेस लिमिटेड म्हणाले,"ही मोहीम केवळ उत्पादनविषयक माहिती संदेश नाही तर हा भारतीय शेतकरी आणि जागरूक ग्राहकाला मन:पूर्वक केलेला सलाम आहे. या TVCS च्या माध्यमातून आम्ही प्रेक्षकांना खरी गुणवत्ता कुठून येते याच्या प्रवासात सामील होण्यासाठी आमंत्रण देतो. फॉर्च्यून होल व्हीट हे शुद्धता, विश्वास आणि गुणवत्ता यांची ओळख आहे आणि आम्ही ती आमच्या ग्राहकांपर्यंत पोहोचवत आहोत याचा आम्हाला अभिमान आहे." फॉर्च्यून होल व्हीट अत्यंत काळजीपूर्वक निवडलेल्या शेतांमधून खरेदी केला जातो, जिथे धान्य सूर्यप्रकाशात पिकवले होते आणि अचूकतेने कापणी केली जाते. पोषणाच्या उच्च निकषांची




पूर्तता होईल आणि सातत्यपूर्ण पोत व चव मिळेल हे सुनिश्चित करत प्रत्येक बॅच कठोर गुणवत्ता चाचण्यांतून जाते. ही मोहीम या अचूक सोर्सिंग आणि टेस्टिंग प्रक्रियेवर प्रकाश टाकते, आणि फॉर्च्यून होल व्हीट मधील प्रत्येक कण हा विश्वासार्ह आहे याची ग्राहकांना खात्री देते. TVCS सध्या महाराष्ट्र आणि गुजरात मधील टेलिव्हिजन, डिजिटल प्लॅटफॉर्म्स, थिएटर्स आणि स्थानिक माध्यमांवर सुरू करण्यात आल्या आहेत. यामुळे AWL ॲग्री बिझनेसच्या ग्राहक-केंद्रित कथनातील वचनबद्धतेला आणि प्रमुख बाजारपेठांमध्ये ब्रँड गुंतवणूक वाढवण्याच्या उद्दिष्टाला बळ मिळत आहे.

## ३९ वर्षीय परिचारिकेवर अत्याचार

**दैनिक युवक आधार**
**रसायनी (आनंद पवार)**

नर्सिंग कोर्सच्या बहाण्याने फसवून लग्नाचे खोटे आश्वासन देऊन एका ३९ वर्षीय महिलेच्या इच्छेविरुद्ध शारीरिक संबंध प्रस्थापित करणाऱ्या धनंजय जाधव याच्यावर रसायनी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलीस सूत्रांकडून समजलेली माहिती अशी की, दुर्गामाता कॉलनी चांभाली येथे राहणारा धनंजय जाधव याने नवीन पनवेल येथे राहणारी ३९ वर्षीय महिलेला नर्सिंग कोर्सच्या बहाण्याने फसवून लग्नाचे खोटे आश्वासन देत तिच्यावर दोन वेळा शारीरिक संबंध प्रस्थापित केले असल्याचे पीडित महिलेने पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे. तिचे अश्लील व्हिडिओ बनवून ते व्हिडिओ व्हायरल करणार अशी धमकी देत तिला ब्लॅक मेल करून लैंगिक व मानसिक छळ केल्याप्रकरणी असाह्य झालेल्या पीडित महिलेने रसायनी पोलीस ठाण्यात१७ मे २०२५ रोजी धनंजय जाधव या व्यक्ति विरोधात रीतसर गुन्हा दाखल केला आहे. धनंजय जाधव याच्यावर रसायनी पोलीस ठाण्यात कॉ.गु.रं.नं.१०२/२०२५ बी.एन.एस.कलम ६९,३५१,(२),३५१(३), प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पोलीस उपनिरीक्षक अनुसया ढोणे ह्या करीत आहेत

# दिव्यांग गायकांचा "स्वरपर्व" प्रस्तुत

## ' तू जो मेरे सूर मे ' संगीतमय सोहळा डोंबिवली मध्ये यशस्वीरित्या संपन्न झाला.

**दैनिक युवक आधार**
**विकास वायाळ**
**मुंबई प्रतिनिधी**

डोंबिवली पूर्व येथील सर्वेश हॉल मध्ये प्रथमच पाच दिव्यांग गायकांनी संगीत प्रेमींसाठी सुंदर संगीतमय गाण्याचे सादरीकरण केले. ही सर्व दिव्यांग गायक अतिशय सुंदर आवाजात गातात हे पाहून चांगल्या गायकांनाही त्यांचा हेवा वाटेल हे नक्कीच.

" स्वरपर्व " संगीतमय गायकांच्या टीम मध्ये गायक आफताफ हा स्वतः बँकेत काम करून आपलं गाण्यांची कला, आवड जोपासतो. गायिका निवेदिता, गायिका रुजूल आताच चांगल्या गुणांनी दहावी उत्तीर्ण झाल्या आहेत. गायक अपूर्व हा लहान वयातच त्यांच्या आई- वडिलांच्या आवडीमुळे गायन क्षेत्राचे शिक्षण घेऊन चांगला गायक म्हणून पुढे येत आहे. आणि शेवटची सर्वात लहान फक्त १२ वर्षांची गायिका श्रेया ही सुंदर गोड आवाजाची जादू करणारी आहे. अशा या ईश्वराने संगीत कला बहार केलेल्या गुणी गायकांना ऐकण्यासाठी संपूर्ण डोंबिवलीकर आतुर




होते.आणि बरेच मोठे मान्यवर, मीडियाही कव्हरेज साठी आले होते. या संगीतमय कार्यक्रम सोहळ्यात प्रमुख पाहुणे म्हणून " ब्रह्माण्डनायक " मधील श्री स्वामी समर्थ महाराजांची भूमिका साकारणारे सिने अभिनेते श्री. अशोक कुलकर्णी सर यांनी उपस्थिती दर्शवली. दिव्यांग गायक मुलांची सुमधुर गाणी ऐकून, लवकर जाणारे अभिनेते अशोक कुलकर्णी सर संपूर्ण कार्यक्रमाचा संपे पर्यंत आनंद घेत थांबले. कार्यक्रमातील सर्वच मुलांचे त्यांनी खूप कौतुक केले आणि यशस्वी गायन क्षेत्रात नाव कमवाल असे शुभाशिर्वाद दिले.

संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन डोंबिवलीकर
श्री. महेश महाजन, मिताली महाजन यांनी उत्तमरित्या पार पाडले.
महेश महाजन हे स्वतः गायक असून त्यांनी त्यांच्या दिव्यांग मुलगा " अपूर्व " याने संगीत क्षेत्रात खूप मोठं व्हावं ही त्यांची इच्छा होती. म्हणूनच त्यांनी व त्यांच्या पत्नी मिताली यांनी अपूर्व ला खूप सुंदर गायन शिक्षण देऊन चांगला गायक केलं आहे.
त्यांच्या प्रेरणेतून " स्वरपर्व " ही संगीतमय सोहळ्याची कल्पना साकार झाली. आणि त्यांना कराओके ग्रुपचे अनुप व मनाली यांनीही बरंच सहकार्य केले.
संपूर्ण कार्यक्रमात रसिकप्रेक्षकांसाठी सुंदर अशी मराठी, हिंदी सुरेल गाण्यांची मेजवानी होती.
मध्यतरानंतर कार्यक्रमा दरम्यान
" मुक्ताई फॉउंडेशन " संस्थेच्यावतीने सर्वच गायकांनां सन्मानपत्र व मेडल स्वरूपात गिफ्ट पार्टनर म्हणून ' स्वरपर्व ' संगीतमय सोहळ्यात सहकार्य करण्यात आले. सन्माननीय सिने अभिनेते श्री. अशोक कुलकर्णी सर व मुक्ताई फॉउंडेशन अध्यक्ष श्री. लव क्षीरसागर यांच्याहस्ते सर्वांचा सन्मान करण्यात आला. सुमधुर गाणी ऐकताना हॉल ची वेळ कशी गेली हे कळलंच नाही. असे सर्व रसिकंप्रेक्षक बोलत होते. सर्वांनी सुंदर गाण्यांचा आनंद घेऊन काहींनी तर नाचून कार्यक्रमाचा उत्साह द्विगुणित केला. या कार्यक्रमात एका ७० वर्षीय आजोबांना सुंदर संगीत गाण्यावर माझे पाय मला शांत बसू देत नाहीत, असे सांगून पूर्ण कार्यक्रम मस्त गाण्यांच्या ठेक्यावर नाचून आनंद घेतला व इतर प्रेक्षकांनाही नाचण्यास भाग पाडले.
डोंबिवलीत अशा रसिकं प्रेक्षकांमुळे कार्यक्रम हाऊसफुल्ल होतात हे दिसून आलं. " स्वर पर्व " च्या कार्यक्रमात आयोजकांचे सिने अभिनेते श्री. अशोक कुलकर्णी यांनी सुंदर संगीतमय गाण्यांचा मला सहभागी केल्याबद्दल आभार मानून अभिनंदन केले व अशा सुंदर कार्यक्रमासाठी मीं सदैव तुमच्या पाठीशी आहे असे सांगितले. आपल्या समाजातील साधारण व्यक्तीपेक्षा दिव्यांग कलाकार हा खूप श्रेष्ठ आहे हे बऱ्याच वेळा पाहण्यात आलं आहे, म्हणूनच अशा उत्तम गायक कलाकार यांना योग्य संधी, व्यासपीठ मिळाली पाहिजे या साठी " मुक्ताई फॉउंडेशन " अध्यक्ष श्री. लव क्षीरसागर यांनी मीं सदैव प्रयत्नशील राहीन असे कार्यक्रमा दरम्यान बोलून दाखवले. " स्वर पर्व " मधील गायक मुलांना यश मिळावे आणि संपूर्ण समाजाला चांगल्या गायकांनां ऐकण्याची संधी मिळावी .यासाठी प्रसिद्धी, प्रसार करू असे " डिजिटल मुंबई वार्ता' टीम ने सांगितले.

# पिंपळनेरचे भूमीपूत्र प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर ( रमाईसुत) यांना जीवनगौरव पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

पिंपळनेरचे भूमिपूत्र कवी तथा बालसाहित्यिक प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर ( प्रदिप बाबुलाल पगारे) हे रमाईसुत या टोपन नावाने कविता , लेख व साहित्य लेखन करतात. त्यांच्या ३० वर्षातील शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना जीवनगौरव पुरस्काराने नाशिक येथे सन्मानित करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजीनगर येथील काळीज माझं साहित्य या साहित्य संस्थेच्या नाशिक येथे आयोजित करण्यात आलेल्या ८ जुन २०२५ रोजी राज्यस्तरीय काव्यसंमेलनात विविध जेष्ठ मान्यवरांच्या हस्ते कवी- प्रदिपगुरूजी पिंपळनेरकर यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार असल्याचे नुकतेच संस्थेचे निवडपत्र प्राप्त झाले आहे. प्रदिपगुरुजी हे पेशाने शिक्षक असून नुकतेच त्यांच्या दोन्ही पायांवर मोठी शस्त्रक्रिया झालेली आहे. अंथरुणाला खिळवून असतांनाही त्यांनी या काळात यांच्या ५० व्या वाढदिवसानिमित्त दोन काव्यसंग्रह प्रकाशित करण्याचा मनोदय व्यक्त केला होता. त्यापैकी " बालमित्रांची छान छान गाणी" हा बालकाव्यसंग्रह




प्रकाशनाच्या वाटेवर असून " लाल पाणी मिळे रक्त" या काव्यसंग्रहाच्या लेखनाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच या काळात त्यांनी ३०० पेक्षा जास्त कवितेची रचना करून १५०-२०० सन्मानपत्रे प्राप्त केली आहेत. तसेच विविध ऑनलाइन काव्यसंमेलनात सहभाग घेऊन विविध पारितोषीके प्राप्त केली आहेत. त्यांच्या या कार्याबद्दल आजारपणाच्या काळात यांना ४-५ पुरस्कारांनी देखील गौरवण्यात आलेले आहे. आजारपणात त्यांचा १० प्रातिनिधिक काव्यसंग्रहात देखील कवितेचा सहभाग आहे. त्यात पाऊस, मधुगंध, क्रांतीज्योती, वारसा, येरे येरे ढगोबा( बालकाव्यसंग्रह), भीम जन्माची गाथा, रानफूल, वसंत ऋतू, आठवणीचा कोपरा व दर्पण या प्रातिनिधिक काव्यसंग्रहांचा समावेश आहे. विशेष बाब म्हणजे त्यांच्या " बालमित्रांची छान छान गाणी" या बालकाव्यसंग्रहाच्या १००० प्रती छत्रपती संभाजीनगर जिल्हातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत मोफत भेट देण्यात येणार आहे. त्याकरिता त्यांनी " मानवता बुक फाउंडेशन" ची निर्मिती केली असून आपल्या प्रियजनांच्या नावे फक्त १००० प्रतींचा छपाई खर्च देणगी देऊन यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्रातील कोणत्याही एका जिल्हासाठी १००० प्रती वाटाण्यात. यात पहिल्या पानावर त्यांच्या प्रियजनांचा फोटो व त्यांच्या स्मरणार्थ मोफत बालकाव्यसंग्रह वाटप. तर शेवटच्या पानावर ज्यांच्याकडून देणगी मूल्य प्राप्त झाले यांचा नामोल्लेख पुस्तकात असणार आहे. या उपक्रमाची सुरुवात गुरुजींच्या मातोश्रींनी केलेली असून कै. बाबुलाल सखाराम पगारे पिंपळनेरकर यांच्या स्मरणार्थ छत्रपती संभाजीनगर जिल्हातील संपूर्ण जिल्हा परिषद शाळेसाठी श्रीमती रमादेवी बाबुलाल पगारे यांचेकडून देणगी मूल्य प्राप्त झालेले आहे. आपल्या राज्यातील इतर जिल्हांसाठी आपण ९८२३११३५९४ या संपर्क क्रमांकांवर संपर्क साधून सविस्तर माहिती घेऊ शकता. प्रदिपगुरूजी यांना यापूर्वी जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगरचा आदर्थ शिक्षक पुरस्कार २०१४, लापन्स क्लब ऑफ औरंगाबादचा श्रेष्ठ गुरुजन पुरस्कार, विद्यार्थी सहायता संघ मुंबईचा साने गुरुजी आदर्श शिक्षक पुरस्कार, मनुष्यबळ विकास अकादमीचा अष्टक्षेत्री गौरव पुरस्कार, अनिस कार्यगौरव राज्य पुरस्कार, मानव प्रबोधन अकादमीचा राज्य पुरस्कार, तसेच पल्स पोलिओ मोहिमे अंतर्गत आंतरराष्ट्रीय पुरस्कार या विविध पुरस्कारांनी यापूर्वी यांचा सन्मान झालेला आहे. गुरुजींनी आतापर्यंत ४५ वेळा रक्तदान केलेले असून समाजाचा रुहभाग म्हणून १५-१७ लाखांपर्यन्त लोकवर्गणीतून विविध शाळांचा कायापालट केलेला आहे. यांच्या सामाजिक व शैक्षणिक कार्यास आमचा मानाचा मुजरा.

## चिखली:-कुदळवाडी-जाधववाडी आरक्षणामुळे भुमीहिन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी, भाजपचे आमदार श्री महेश दादा लांडगे यांचा सक्रिय सहभाग व सहकार्य.

**दैनिक युवक आधार**
**शिवाजी वाघमारे**
**चिखली पुणे प्रतिनिधी**

**चिखली** :- शहर विकास आराखड्यातील कुदळवाडी - जाधववाडी क्षेत्रावरील राखीव आरक्षण उठवण्यासाठी मी शेतकऱ्यांचा बरोबर उभा आहे. असे भोसरी विधानसभेचे भाजपचे आमदार श्री महेश दादा लांडगे यांनी विश्वास दिला आहे .
कुदळवाडी-जाधववाडी परिसरातील तब्बल १७५ एकरांवर सर्वात मोठे आरक्षण टाकण्यात आले आहे. तिन महिन्यांपूर्वी ४५०० अनाधिकृत बांधकामे व पत्राशेड पाडून हा संपूर्ण परिसर भुईसपाट करण्यात आला होता. या पाठोपाठ विकास आराखड्यातील ९०% टक्के क्षेत्रावर आरक्षण टाकण्यात आल्याने भुमीहिन शेतकरी हतबल झाले आहेत. या विषयावर गेल्या आठवड्यापासून काल पुन्हा एकदा दुसरी बैठक आयोजित करण्यात आली होती.हि बैठक श्री संत सावतामाळी मंदिरामध्ये पार पडली.श्री क्षेत्र टाळागावं - चिखली येथील ग्रामस्थांनी एक मिटिंग घेतली या मिटिंगमध्ये खरया अर्थाने महत्त्वाचा विषय म्हणजे नवीन डिपीमध्ये एसएसीसी हे आरक्षण टाकण्यात आले आहे एकुण १७५ एकरांवरच्या या आरक्षणामुळे चिखली, कुदळवाडी, जाधववाडी आहेरवाडी, रोकडे वस्ती मधील विवीध भागातील मुळ शेतकरी हे भूमीहीन होणार आहेत. या निर्णयाला विरोध दर्शविण्यासाठी सर्व स्थानिक



शेतकऱ्यांनी एकत्रित बैठक घेतली ,सर्व शेतकऱ्यांनी या ठिकाणी जाहीर विरोध दर्शविला.
भोसरी विधानसभेचे भाजपचे आमदार श्री महेश दादा लांडगे यांना त्यां ठिकाणी सर्व ग्रामस्थांनी निमंत्रित केले होते स्वतः भाजपचे आमदार श्री महेश दादा लांडगे उपस्थित होते आमदार साहेबांनी सर्व शेतकऱ्यांना दिलासा दिला, शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी मी शेतकऱ्यांचा दोन पावलं पुढे असेल, अशी ग्वाही देत आहे . हे आरक्षण उठवण्या संदर्भात मी नक्कीच शेतकऱ्यांसाठी पाहिजे ती मदत करेल,भमिहिन शेतकऱ्यांना पुन्हा त्याच जमीनी रहिवासी झोनमध्ये कशा मिळतील या साठी मी सतत प्रयत्न करेल असे आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांना दिले. या मिटिंगमध्ये मोठ्या प्रमाणात भुमिहिन शेतकरी आणि त्याच बरोबर समस्त ग्रामस्थ व टाळगाव -चिखलीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

# म्हाडाच्या इमारत दुरुस्तीला पावसाळ्यापूर्वी गती

## प्रस्ताव त्वरित मार्गी लावण्याचा म्हाडाचा निर्णय

**मुंबई :** आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील म्हाडाच्या उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे. कॅबिनेट मंत्री मंगल प्रभात लोढा यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्वसन मंडळ (म्हाडा) यांना उद्देशून पाठवलेल्या पत्राला सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

या पत्राद्वारे मंत्री लोढा यांनी म्हाडाकडे मागणी केली होती की, उपकर प्राप्त इमारतींना दिल्या गेलेल्या ७९ (ए) नोटिसीमुळे दुरुस्तीच्या कामांमध्ये अडथळा निर्माण होत आहे. पावसाळ्याच्या तोंडावर या इमारतींच्या दुरुस्तीसाठी प्रस्ताव मंजूर करून कामांना गती देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले होते.

म्हाडा मंडळाने मंत्री लोढा यांच्या सूचनेची दखल घेतली असून, सदर मागणी मान्य करत इमारतींच्या दुरुस्तीबाबतचे प्रस्ताव त्वरित मार्गी लावण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे पावसाळ्यात नागरिकांचे प्राण आणि मालमत्तेचे संभाव्य नुकसान टळणार असून, सुरक्षिततेच्या दृष्टीने मोठा दिलासा मिळणार आहे.

या उपकर प्राप्त इमारतींच्या दुरुस्तीसाठी आवश्यक निधी आधीच वितरीत करण्यात आलेला आहे. त्यामुळे आता कामांना वेगाने गती मिळणार असून, पावसाळ्यापूर्वीची तयारी पूर्ण होणार आहे.

### ‘त्या’ झोपडपट्टीवासीयांना आवाहन

**मुंबई :** पावसाळ्यातील धोका लक्षात घेता घाटकोपर विभागातील विक्रोळी पार्कसाइट, विक्रोळी (पश्चिम) आणि घाटकोपर (पश्चिम) भागातील वर्षानगर, रामनगर, संजय गांधी नगर, राहुल नगर, गणेश नगर, खंडोबा टेकडी, आझाद नगर, सोनिया गांधी नगर, प्रेम नगर व आनंद नगर या ठिकाणी डोंगराळ परिसरात राहणाऱ्या झोपडपट्टीवासीयांना स्थलांतर होण्याचे आवाहन पालिका प्रशासनाने केले आहे. परिसरात राहणाऱ्या नागरिकांना एन विभाग कार्यालयातर्फे सावधानतेच्या सूचना देण्यात आल्या आहेत. स्थलांतर न करता तेथेच राहणाऱ्या रहिवाश्यांची जबाबदारी त्यांची स्वतःची असेल, असे पालिकेतर्फे सांगण्यात आले आहे.



## नालेसफाईची झाडाझडती...



### हयगय केल्यास कारवाई - शिंदे

मुंबई शहर व उपनगरात सुरू असलेली नालेसफाईचे काम ७ जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी महापालिका प्रशासनाला दिले. वेळेत काम पूर्ण न करणाऱ्या, नालेसफाईच्या कामात हयगय करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल. असे सांगत नाल्यातून काढलेला गाळ ४८ तासांच्या आत उचलला जावा, असे आदेश उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी भांडुप येथील उषानगर, उषा कॉम्प्लेक्स, नेहरूनगर नाला वडाळा, दादर येथील धारावी टी जंक्शनजवळील नालेसफाईची पाहणी केली. मुंबई महानगरात आतापर्यंत झालेल्या कामांची माहिती यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी दिली.

आतापर्यंत मोठ्या नाल्याची ८५ टक्के तर छोट्या नाल्यांची ६५ टक्केपर्यंत सफाई पूर्ण झाली असून अजूनही १५ दिवस हातात आहेत. त्यामुळे हे काम वेळेत पूर्ण होईल, असा विश्वास उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला. रेल्वेच्या कल्व्हर्ट खालील कचरा रोबोटच्या मदतीने स्वच्छ करण्यात येत आहे. महापालिकेने दरवर्षी पाणी साचणारी ठिकाणे निश्चित केली असून ४२२ ठिकाणी पंप लावले आहेत, तर २ ठिकाणी होल्डिंग पौंड आणि १० ठिकाणी छोटे पंपिंग स्टेशन कार्यान्वित केले असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

शिंदे यांनी विक्रोळी येथील सूर्या नगर या दरड प्रवण क्षेत्राला भेट देऊन येथे महापालिकेच्या वतीने संरक्षक जाळी बसवण्याचे निर्देश दिले. दरवर्षी याठिकाणी दुर्घटना घडत असल्याने स्थानिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यात यावे, असे संबंधित अधिकाऱ्यांना उपमुख्यमंत्र्यांनी निर्देश दिले.



# आता हुंडामुक्तीसाठी महाराष्ट्रात लढा

## शरद पवार गटाची २२ जूनपासून मोहीम

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या वतीने २२ जूनपासून राज्यात हुंडाबळी व हिंसामुक्त महाराष्ट्रासाठी लढा उभारण्याचा निर्धार केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी सांगितले की, वैष्णवी कस्पटे-हगवणे हिचा वेदनादायक पद्धतीने हुंडाबळी झाला. ज्या राज्याने स्त्रीमुक्तीच्या दृष्टीने देशाला दिशा दाखविण्याचे काम केले तेथे वैष्णवीसारख्या लेकीचा बळी जाणे हे संतापजनक आहे. या घटनेमुळे महाराष्ट्र सुन्न झाला असून यासाठी केवळ संताप आणि दुःख व्यक्त करून भागणार नाही तर जोरदारपणे कृतिशील जागृतीचे पाऊल उचलावे लागेल.

समाजातील सर्व घटकांचा, सर्व यंत्रणांनी यात सहभाग घ्यावा आणि



मोहिमेतूनच ‘हुंडामुक्त महाराष्ट्र आणि हिंसामुक्त कुटुंबाचे’ उद्दिष्ट सध्या करता येईल आणि वैष्णवीला तीच श्रद्धांजली ठरेल, अशी पोस्ट सुप्रिया सुळे यांनी केली आहे.

सुळे म्हणाल्या की, शरद पवार यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र राज्याने तीन दशकांपूर्वी देशातील पहिले महिला धोरण २२ जून १९९४ रोजी जाहीर केले. ते धोरण तयार करण्यामध्ये महाराष्ट्रातील सर्व घटकांनी आणि यंत्रणांनी आपले योगदान दिले होते. त्यामुळे अनेक सामाजिक, राजकीय, आर्थिक बदल राज्यातील महिलांच्या जीवनात घडले.

> गेली ५० वर्षे राज्यामध्ये विविध संस्था, संघटना आणि व्यक्ती स्त्री पुरुष समतेची चळवळ कष्टाने आणि नेटाने पुढे नेत आहेत. हे सर्व पूर्वसंचित सोबत घेऊन येत्या २२ जूनपासून पुण्यातून मोहिमेची सुरुवात होणार आहे. वर्षभर वेगवेगळ्या टप्प्यात ही मोहीम राज्याच्या सर्व भागात राबविण्यात येणार असून मोहिमेचे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत याचा पाठपुरावा करणार आहोत.
> - **सुप्रिया सुळे**, खासदार

# “लोकशाही वाचवण्यासाठी आंबेडकरी विचारांची गरज” — दलित पँथर नेते कीर्ती ढोले यांचे वक्तव्य



मुंबई(शांताराम गुडेकर

सदिच्छा सामाजिक विकास संस्था च्या वर्धापन दिन व बुद्ध पौर्णिमाचे औचित्य साधत नुकतीच डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि छत्रपती शिवाजी महाराज यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले दलित पँथरचे नेते कीर्ती ढोले यांचे प्रभावी व ज्वलंत भाषण.कीर्ती ढोले यांनी आपल्या भाषणात सांगितले की,“समाजासाठी काम करणाऱ्यांच्या कार्याची कृतज्ञतेने दखल घेतली पाहिजे. त्यांना बळ मिळाले पाहिजे. त्यांच्या चळवळीला ताकद मिळाली पाहिजे.” ते पुढे म्हणाले, “आजच्या परिस्थितीत आपण लोकशाहीच्या गंभीर संकटातून जात आहोत. बुद्ध आणि बाबासाहेब आंबेडकरांचे विचार हे केवळ वैचारिक नाहीत, तर मानवतेचा मार्ग दाखवणारे आहेत. माणसं जगवणं हे त्यांचं ध्येय होतं, मारणं नाही.”भारतातील लोकशाहीवर होत असलेल्या हल्ल्यांकडे लक्ष वेधत, ढोले म्हणाले, “नेत्यांना बदनाम करण्याचे कट रचले जात आहेत. हे थांबवायचे असेल, तर आंबेडकरी विचारांशी निष्ठा ठेवत प्रश्न विचारण्याचे आणि चुकीला विरोध करण्याचे धैर्य आपल्यात पाहिजे.”त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, “प्रबोधन आजही गरजेचे आहे. बाबासाहेबांनी सर्वांचे प्रबोधन केले, आता त्यांचे अनुयायी पुढे येणे गरजेचे आहे.” कार्यक्रमाच्या शेवटी कीर्ती ढोले यांनी सदिच्छा सामाजिक संस्थेला मनापासून शुभेच्छा दिल्या व सामाजिक कार्यात सातत्याने योगदान देण्याचे आवाहन केले. या सोहळ्यात विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात आयु. तजीलाबाई खैरमोडे यांना जीवन गौरव पुरस्कार देऊन विशेष सन्मान करण्यात आला. त्यांच्या समाजहितासाठीच्या सातत्यपूर्ण कार्याची दखल घेत हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.उपस्थित सर्वांनी त्यांच्या कार्यास उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. यावेळी इतर मान्यवरांना विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यापैकी राजेंद्र नायकर, ए. रविचंद्रन (समाज गौरव पुरस्कार), मनोहर मोरे (समाज भूषण पुरस्कार), राहुल भंडारे (कलावैभव पुरस्कार), आणि पल्लवी जाधव व चैतन्य जावळे (धम्म प्रेरणा पुरस्कार) यांनाही गौरवण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष सुनील कांबळे ,सचिव शशिकांत गायकवाड आणि त्यांच्या सर्व पदाधिकारी केले होते. सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून कार्यक्रम यशस्वी केला.

# मंठा येथे राज्यस्तरीय शिवसेना ओबीसी-व्हीजेएनटी संवाद दौऱ्याचे आयोजन.

### तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या नेतृत्वात संघटना वाढीसाठी उत्कृष्ट काम - प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी.नामदेव मंडपे**

**मंठा जालना-** शिवसेनेचे महाराष्ट्र राज्याचे ओबीसी- व्हीजेएनटी सेलचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांच्या प्रमुख उपस्थितीत मंठा येथील शिवसेना तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांच्या कार्यालयात संवाद मेळाव्याचे आयोजन शनिवार (दि.२४) रोजी करण्यात आले.पक्षप्रमुख एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना धनगर, भटके विमुक्त, ओबिसी, बारा बलुतेदार या समाजाच्या वेगवेगळ्या जातींच्या कल्याणकारी योजना, महामंडळे व कल्याणकारी शासननिर्णय त्यांच्याद्वारे घेण्यात आली.या विकासाच्या व कल्याणकारी योजनांचा प्रसार करणे हे संवाद दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट आहे. तसेच ओबीसी समाजाचे मायक्रो प्लॅनींग करुन त्यांच्या समस्या सोडविण्याचे काम येत्या काळात आम्ही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाने अधिक जलद गतीने करणार आहोत. ओबीसी प्रवर्गात काही मुख्य जाती वगळल्यास इतर छोट्या छोट्या जातींमधील लोकांच्या अनेक समस्या आहेत आणि त्या जाती मुख्य प्रवाहापासून दुर्लक्षित आहे म्हणून यासर्व वंचित समाजाशी संवाद साधण्यासाठी व




त्यांच्या समस्या जाणुन घेण्यासाठी ह्या ओबीसी – व्हीजेएनटी संवाद दौऱ्याचे ३३ दिवस ३३ जिल्ह्यात अयोजन करण्यात आले आहे. या सर्व मायक्रो जातीतील जनतेला शिवसेनेशी घट्ट जुळवन्याचे काम आम्ही या माध्यमातून करत आहोत असे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब किसवे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख उदयसिंह बोराडे,सोलापुर जिल्हा प्रमुख सुयश करचे,सातारा जिल्हाप्रमुख हेमंत भोईटे,पुणे जिल्हाप्रमुख योगेश धरम,महिला उप जिल्हा प्रमुख कासाबाई शिरगुले,महिला तालुका प्रमुख सुनीता देशमुख,सविता गवली,उप तालुका प्रमुख रामराव वरकड,बालासाहेब देशमुख,पांडुरंग बोराडे,भिमराव वाघ,ऑड राजेश खरात,भगवान गायकवाड,सतिष वायाळ,स्वप्निल गडदै,चादं पठान,महेश विधाते,नंदु जाधव,विनोद खरात,भगवान बोराडे,माऊली वायाळ, उपस्थिती होती.

# कड्यात शिवरायांची नित्य आरती मुस्लिम मावळा समीर शेख यांच्या हस्ते संपन्न

**दैनिक युवक आधार**
**मारुती सत्रे**
**आष्टी प्रतिनिधी :**

शिवरायांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत, फुले शाहू आंबेडकरांच्या विचारांचा वसा आणि वारसा चालवत असलेले, सर्व धर्मसमभाव जपणारे, सामाजिक कार्यकर्ते, शिव मावळा,पत्रकार समीर शेख यांच्या शुभहस्ते दि.२२-०५-२०२५ रोजी छत्रपती चौक कडा येथे नित्य आरती कार्यक्रम पार पडला. त्यांना दिलेला मान म्हणजे एक प्रकार त्यांचे सामाजिक कार्याचा गुणगौरवच म्हणावा लागेल. खर तर ज्या रयतेच्या राजाने, परकीयांशी संघर्ष करून जिद्दीने, हिंमतीने शून्यातून स्वतःचे राज्य निर्माण केले. हिंदवी स्वराज्याची स्थापना करून स्वातंत्र्याच्या स्वराज्याचा भगवा रोवला. आणि भगवा म्हणजे नुसता झेंडा अथवा निशाणी नाही. भगवा म्हणजे सह्याद्री, भगवा म्हणजे स्वराज्य, हे स्वराज्य निर्माण करताना यावेळी मुस्लिम मावळ्याचे अमूल्य योगदान लाभले. त्यांनी आपल्या राजवटीत धार्मिक सहिष्णुता जपली आणि कोणत्याही धर्माला विशेष प्राधान्य दिले नाही. सर्व धर्मियांना आपल्या स्वराज्यात मनाचे




स्थान दिले.त्यात शिवरायांच्या सैन्यात मदारी मेहतर आणि सिद्धी इब्राहिमः हे मुस्लिम सरदार यांच्यासह अनेक सैनिक मोठया संख्येने विविध जबाबदारी सांभाळत होते. हा शिवरायांचा आदर्श विचार मुस्लिम शिवमावळा समीर शेख हा सामाजिक एकता व सर्व धर्म समभाव जपत आपल्या कृतीतून समाजाला दिशा देत आहे.. फक्त शिवाजीराजांच्या जन्मदिवशी ‘शिवजयंती’ला शिवरायांचा जयघोष करणे सोपे आहे. पण खरी आवश्यकता असते रोजच्या दैनंदिन जीवनात सामाजिक एकोपा आणि समतेचे विचार समाजातील तळागाळातील नागरिकापर्यंत रुजवणे हिच स्वराज्याची खरी प्रेरणा होती. याची आज समाजाला गरज आहे. हिच त्यांची शिकवण चरित्रातून जाणून घेऊन जनतेच्या दैनंदिन सामाजिक, आयुष्यात कृतीतून विचारात आणणे हेच मोलाचे कार्य समीर शेख या सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून होत आहे. तालुकाच्या कानाकोपऱ्यात सामाजिक कामासोबत शिवरायांचा विचार समीर शेख यांच्या माध्यमातून जोपासला जात आहे. यात सामाजिक कार्याची पोहोचपावती म्हणून, नित्य आरतीचा त्यांना मान देऊन त्यांच्या कार्याचा एक प्रकारे कडा येथील ग्रामस्थ व शिवप्रेमींनी एक प्रकारे सन्मानच केला आहे. या सन्मानाने येत्या काळात समाजातील विविध समाज घटकात एकोपा,समता, सर्वधर्म सहिष्णुता जपत, अधिक चांगल्या प्रकारे रुजवण्यासाठी यामुळं नवी उर्जा प्रेरणा निश्चित मिळेल.

## सौर वाळवणी आमसुलेः कोकणातील पर्यावरणपूरक क्रांती;शैलेश राईलकर यांचे नाविन्यपूर्ण प्रयोग कोकणातील कृषी उत्पादनांना देत आहेत नवे रूप

**दैनिक युवक आधार - निलेश फुंडे रेवदंडा**

**रेवदंडा -** चौल, निसर्ग, पर्यावरण आणि कोकणमित्र या संकल्पनेतून काम करणारे शैलेश राईलकर यांनी कोकणातील पारंपारिक कोकम उद्योगाला एक नवे पर्यावरणपूरक वळण दिले आहे. त्यांच्या पुढाकाराने सौर वाळवणी यंत्राचा वापर करून तयार करण्यात आलेली आमसुले आता केवळ भाजी आमटीपुरती मर्यादित न राहता विविध रूपांत बाजारात दाखल होत आहेत.सौर वाळवणी यंत्रात तयार केलेल्या या आमसुलांची खासियत म्हणजे त्यांचा नैसर्गिक रंग, सुवास आणि दीर्घकाल टिकणारी गुणवत्ता. पारंपारिक पद्धतीने तयार होणाऱ्या आमसुलांची चव तीव्र, वास उग्र आणि स्वरूप थोडकं अस्वच्छ असते, परंतु सौर यंत्रामुळे मिळणाऱ्या स्वच्छ, कोरड्या आणि सौंदर्यदृष्ट्या आकर्षक आमसुलांनी बाजारपेठेत एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.या आमसुलांपासून तयार होणारे ताज्या चवांचे कोकम सरबत आणि दर्जेदार सोलकढी ग्राहकांच्या विशेष पसंतीस उतरते आहे. विशेष म्हणजे, ही आमसुले पारंपरिक पद्धतीच्या तुलनेत कमी वेळात आणि अधिक परिणामकारकतेने तयार होतात. त्यामुळे शेतकरी व स्वयंपाककला उद्योगात गुंतलेले अनेक जण याकडे पर्याय म्हणून पाहू लागले आहेत.शैलेश राईलकर सांगतात, “सौर ऊर्जेचा वापर हा केवळ पर्यावरणपूरक उपाय नाही तर तो कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धन करणारा महत्त्वाचा टप्पा ठरतो.



कोकणातील कोकमासारख्या पिकांसाठी हे फार मोठे परिवर्तन आहे.”‘निसर्ग पर्यावरण आणि कोकणमित्र’ या चळवळीच्या माध्यमातून राईलकर यांनी स्थानिक शेतकऱ्यांना सौर वाळवणी यंत्राच्या वापराबाबत प्रशिक्षण दिले असून आता अनेक गावे हळूहळू या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत आहेत.हा उपक्रम केवळ कोकणातील परंपरा जपणारा नाही, तर त्याच वेळी आधुनिकता, पर्यावरण संरक्षण आणि अर्थकारण यांच्यातील समतोल राखणारा एक अनुकरणीय प्रयोग ठरतो आहे.